# शुद्ध भक्तिपंथाचा इतिहास

अर्थात्

# प्रार्थना समाज परिचय

[ प्रि. वि. के. जोग यांच्या इंग्रजी
निबंधाचा अनुवाद ]

294

221

डॉ. व. म. ह. वा. वोलवार,
ग्रंथ संग्रह

संपादक

वामन अनंत गरुड

# शुद्ध भक्तिपंथाचा इतिहास

अर्थात्

# प्रार्थना समाज परिचय

[ प्रि. वि. के. जोग यांच्या इंग्रजी निबंधाचा अनुवाद ]

पोतदार ग्रंथसंग्रह

संपादक

**वामन अनंत गरुड**

१९४८ ]　　　　[ किं. ८ आणे

कै. म. म. द. वा. पोतदार,
ग्रंथ संग्रह

प्रकाशक :
य. गो. जोशी,
६२३/१५ सदाशिव, पुणें २

मा १८७९

मुद्रक :
द. कृ. काकनूरकर,
प्रकाश मुद्रणालय,
३९५/४ सदाशिव पेठ, पुणें २

790
294/५५८
17-11-9

# मनोगत

**धर्म शाश्वत सखा सुजनांचा । तोचि एक हरि ताप मनाचा ॥**
**संकटीं त्यजित जो न तयातें । तोचि वारि परलोकभयातें ॥**

वेदकालापासून तों आजपर्यंत जितके धर्मपंथ–शाखा निघाल्या त्यांना जें योग्य कारण झालें, तेंच प्रार्थनासमाज स्थापन होण्यास झालें आहे.

प्रचारांत असलेल्या रूढ धर्मचालीरीतींचा आधुनिक कालांत न पटणारा असा जो पुष्कळसा भाग, त्यांत पुष्कळांस सुधारणा हवीशी वाटते. हा असमाधानकारक भाग गाळून वर्तमानकालाप्रमाणें त्यांत उपयुक्त सुधारणा व्हावी हाच प्रार्थनासमाजाचा उद्देश आहे. वास्तविक हा पंथ नवीन नाहीं. महाभारतांत शांतिपर्वांत 'नारायणीय' म्हणून एक प्रकरण आहे. त्यांत जो सनातन एकांतिक धर्म म्हणजे एकेश्वरी धर्म सांगितला आहे तोच प्रार्थनासमाजाचा धर्म आहे. तेव्हां तो निःसंशय सनातन आहे, सर्वांत श्रेष्ठ आहे, आणि भगवद्गीतेंत जो भक्तिरूप धर्म तोहि तोच आहे. यावरून हा हिंदुधर्माहून निराळा नाहीं हें दिसेलच. हिंदुधर्म हा वास्तविक पाहतां न्या. मू. रानडे म्हणाले त्याप्रमाणें गंगानदीसारखा आहे. गंगानदी उगमापाशीं लहान असून पुढें तींत अनेक प्रवाह मिळून तो मोठा होऊन समुद्रांत एकरूप झालेला आहे. तेव्हां हिंदुधर्म इतर धर्मांप्रमाणें एकच एक ग्रंथ प्रमाण मानून राहिलेला नाहीं. त्यांत प्रथम वेद व तेहि चार लिहिले गेले. नंतर उपनिषदें, श्रुति-स्मृति इत्यादि पुष्कळ निरानिराळ्या विषयांवर स्वतंत्र ग्रंथ अधिकारवाणीनें लिहिले गेले. या प्रकारें त्यांत सारखी सुधारणा होत होती. पुन्हा हिंदुधर्मानें सर्व धर्मांतीलहि चांगला भाग आपल्यांत सामावून घेतला आहे. कबीरासारख्या साधूंच्या द्वारें मुसलमान धर्मांतील कांहीं चांगला अंश हिंदुधर्मांत आलेला आहे. 'अहिंसा परमो धर्मः' हें बौद्ध धर्मांतून घेतलें आहेच.

असा हिंदुधर्म आजपर्यंत सुधारत आला आहे. परंतु आतां

मात्र ती ग्रहणशक्ति-क्रिया थांबलेली दिसते व भलतेच आचार-विचार रूढ होऊन बसले आहेत व ते कोणास पटतहि नाहींत. त्यामुळेंच धर्म हा हल्लींच्या तरुणांस नकोसा झाला आहे. धर्म ही अफूची गोळी वाटत आहे. धर्मासंबंधीं त्यांनीं आपल्या कल्पना वाईट करून घेतल्या आहेत. धर्माची जरूरच नाहीं असें प्रतिपादून विवाह वगैरेसारखे विधी धर्मावांचून होत नाहींत, ते कायदेशीर धरले जात नाहींत, असें पाहून रजिस्टर्ड विवाह करून घेण्याची रीत सुरू करीत आहेत. संतांनीं टाळ कुटण्याकडे प्रवृत्ति वाढविली, नामर्दपणा जनांत आणला, कर्तव्यशून्य बनविलें वगैरे आरोप ते धर्मावर करीत असतात. तेव्हां धर्माची जरूरच नसतांना व अगोदरच हिंदुधर्मात कितीतरी धर्मपंथ आहेत हें अगणित देवस्थानांकडे पाहिल्यास सहज समजत असतांना निराळा धर्मपंथ काढून तुम्ही (प्रार्थना-समाजीय मंडळी) काय साधणार आहांत, असे प्रवाद ऐकू येतात. याशिवाय दुसरी गोष्ट अशी कीं, प्रथम राजकीय चळवळींकडे लक्ष द्या, त्यांत प्रगति करा, स्वराज्याच्या प्रीत्यर्थ तनु मन धनहि वेंचा, मग धर्मसुधारणा स्वराज्य मिळविल्यावर आपोआपच होईल, असा युक्तिवाद लढवितात. परंतु कोणत्याहि गोष्टीस धर्माचें अधिष्ठान पाहिजे. धर्माचें पालन केल्यानेंच मनुष्य जगांतील आपलें कर्तव्य ओळखतो व तें कर्तव्य नीतीनें, न्यायानें आचरतो. हें सत्य कोणाच्या लक्षांत येत नाहीं. प्रत्येक देशांत व प्रत्येक धर्मांत जीं अशीं माणसें झालीं त्यांचीं चरित्रें पाहिल्यास अ-धर्मानें चालणें चूक आहे, तें अवनतीचें लक्षण आहे, हें पटेल. शिवाजी-महाराजांच्या वेळीं साधुसंतांची बरीचशी ख्याति होती, त्यांना मान होता, हें रामदास-तुकाराम यांच्याकडे पाहून लक्षांत येईल. रामदासांनीं स्वराज्याचा पाया भक्कम करण्यास उत्तेजन दिलें. तुकारामासारख्यांनीं अनेक देवतांच्या उपासनेंतून एकच देव व तोहि 'हृदयींच दाविला' व सत्य, न्याय, प्रेम यांचेच पाठ देऊन जातिभेद मोडण्याचा प्रयत्न केला. त्या कारणानें वीर मराठ्यांना राज्य मिळविण्यास स्फूर्ति झाली. ज्या वेळीं महाराष्ट्रांत साधुसंतांचे उपदेश बाजूला पडले, भलतेच आचारविचार रूढ होऊन असत्यधर्माचा प्रसार होऊं लागला त्याच वेळीं मराठशाही नष्ट झाली. संतांचें नांवहि त्या वेळीं कोणी घेईनासें झालें. जणू काय तें लोपलें होतें.

त्यांच्या म्हणण्याला प्राधान्य राहिलें नव्हतें. हेंच कारण राज्य नष्ट होण्यास झालें आहे. 'विसरुनी बंधु वाचें नातें। करिते झाले व्यर्थ कलहांतें॥' याप्रमाणें नीच भावनांचाच चोहोंकडे प्रादुर्भाव प्रामुख्यानें दिसत होता. वास्तविक धर्मास प्राधान्य दिल्याखेरीज कुटुंब काय व देश काय त्या ऊर्जितावस्थेस येणार नाहींत, हें त्रिकालाबाधित सत्य आहे; पण हें अद्याप उमजत नाहीं. हें पाहूनच प्रार्थनासमाजानें धर्म हें जीवन आहे, या जीवनांत जर धर्मतत्त्वें मनःचक्षूसमोर दिसलीं तरच सर्वत्र उन्नति होईल, असा उपदेश दिला.

जनांना लोकहिताच्या गोष्टी निरपेक्ष बुद्धीनें करण्याचें कर्तव्य वाटावें, तें जीवनाचें सार्थक दिसावें, असें आपणांस हवें असेल तर धर्म आचरणांत पाहिजे. हल्लीं धर्म व आचार यांची फार फारकत झाली आहे. रूढ धर्म सत्य नाहीं. व्यक्तीचे सर्व व्यवहार सकाळपासून संध्याकाळपर्यंत धर्मानें झाले तर कोणाहि जीवाचा द्वेष-मत्सर कोणत्याहि व्यक्तीकडून, निदान अविचारानें तरी, होणार नाहीं. एकमेकां साहाय्य करून सुख-सलोख्यानें जगांत नांदावें हा सुविचार दृढ होईल. इत्यर्थ, धर्माची कांस धरल्याखेरीज ह्या गोष्टींत यश येणार नाहीं हा अनुभव सर्व देशांतील साधुसंतांचा आहे. ह्याचा विसर पडला म्हणूनच एक लढाई झाली, दुसरी झाली, तिसरी होणार, असें अनिश्चित व संकटमय जीवन होत आहे. हेंच जाणून प्रार्थनासमाज साधुसंतांचे आदेश निदर्शनास आणीत आहे. हें ह्या 'प्रार्थनासमाजपरिचया'वरून स्पष्ट समजेल. प्रार्थनासमाजाचा मोठा इतिहास प. वा. द्वा. गो. वैद्य, मुंबई, प्रार्थनासमाजाचे एक मोठे कार्यकर्ते, यांनीं लिहिल्यास जवळ जवळ पंचवीस वर्षें झालीं. तो मिळण्यासारखाहि आहे; परंतु आज थोडक्यांत लोकांच्या अवलोकनांत यावा म्हणून हा प्रयत्न आहे. हें पुस्तक वाचून प्रार्थनासमाजाची आवश्यकता काय आहे हें कळेल.

हा प्रार्थनासमाजाचा थोडक्यांत दिलेला इतिहास प्रथम वाडिया कॉलेजचे प्रि. आण्णासाहेब जोग यांनीं इंग्रजीमध्यें लिहिलेला आहे पण तो अमुद्रित; अतएव प्रसिद्ध नाहीं. त्याची एक टंकलिखित प्रत त्यांनीं मोठ्या आस्थेनें माझ्याकरितां राखून ठेविली होती. ती मला मिळाल्यावर फक्त माझ्या संग्रहास असण्यापेक्षां प्रि. जोग यांच्या उपकारांचा

उपयोग कांहीं करावा; ‘ सेवितों हा रस । वांटितों आणिकां ॥ ’ याप्रमाणें याची माधुरी एकट्यानेंच चाखण्यांत नाहीं तर ती माधुरी आपणाबरोबर इतरांनाहि मिळण्यांत तिचा आनंद दुणावतो, हा मनुष्याचा स्वभावच आहे; हें लक्षांत घेऊन याचें रूपांतर मातृभाषेंत केल्यास बरें होईल असें वाटलें. परंतु तें रूपान्तर करणें माझ्या बुद्धीच्या टप्प्याबाहेर असल्यानें मी थोडा अस्वस्थ झालों. पण त्याच क्षणीं ‘अंतरीं निर्मळ, वाचेचे रसाळ ।’ व नेल्सनप्रमाणें दुसऱ्याची तहान भागविण्याची ज्यांच्या स्वभावाची ठेवण दिसते ते कोशकार व इतिहाससंशोधक रा. रा. चिं. ग. कर्वे भेटले. अस्वस्थतेचें कारण सांगतांच त्यांनीं ती इंग्रजी हस्तलिखित प्रत घेतली, खिशांत घातली व तिचें अनुवादनच नव्हे तर पुस्तक छापून तयार करून देण्याचें आपण होऊन मोठ्या आनंदानें आपल्या शिरावर घेतलें. परमेश्वराची इच्छा–कृपा असल्यावर तो अनंत हस्तांनीं देतो म्हणतात तें असत्य नाहीं, हें ह्या काकासाहेब कर्वे यांच्या एवढ्या मोठ्या उपकाराच्या ओझ्याखालीं मी चिरडला जात आहें त्यावरून वाटतें. परंतु कर्वे काकांनीं आपल्या नेहमींच्या परोपकारी स्वभावास अनुसरूनच ही गोष्ट केली आहे. यापूर्वीच त्यांनीं माझें आत्मचरित्र व थोडीं धर्मपर व्याख्यानें ‘ सुबोधन आणि धर्मचिंतन ’ या नांवानें प्रसिद्ध केलीं आहेत. तेव्हां त्यांचे उपकार फेडण्यास मी असमर्थ आहें. पण ईश्वर समर्थ आहे. त्याच्याजवळ जमाखर्च आहे. तो हे माझे उपकार मी दुबळा जाणून फेडील, या भरंवशावर मी समाधानी आहें.

आतां प्रि. जोग यांची ज्यांना माहिती आहे, त्यांना त्यांच्या विविध निरपेक्ष कार्याविषयीं सांगणें नलगे. जवळ जवळ चाळीस वर्षें विद्यादानाचें कार्य करण्यांत रत असलेले प्रि. जोग म्हणजे वाडिया कॉलेज, व वाडिया कॉलेज म्हणजेच प्रि. जोग, हें सर्वांस माहीत आहे. ते कॉलेजच्या कामांत केव्हांहि पाहा निमग्न असतात. त्यांतून आपलें तनु-मन काढून इतर गोष्टींकडे वळविणें त्यांना दुरापास्त होतें. प्रापंचिक गोष्टींतहि ते शक्य तितकें कमी लक्ष देतात. परंतु ‘ धर्माच्या पायावर आपण हीं सर्व कामें करतों,’ अशा पूर्ण विश्वासानेंच ते नित्याच्या व्यवसायांतून अल्पसा वेळ मिळाल्यास किंवा कांहीं वेळ मुद्दाम काढून आपलें तनु-मन-धन हीं

धर्मकार्याकडे वेंचतात. त्याचाच परिणाम 'प्रार्थनासमाजाचा परिचय' लिहिणें हा आहे. त्यांचें हें आचरण आज सतत बारा वर्षें मी आदरानें अवलोकन करीत आहें.

मुंबईस प. वा. द्वा. गो. वैद्य यांच्या आचरणाचा असाच परिणाम माझ्या मनावर होऊन मी माझ्या अल्प बुद्धिसामर्थ्याप्रमाणें समाजकार्यांत पंधरा वर्षें वावरत आहें. त्यांतील येथील बारा वर्षें प्रि. जोग यांच्याकडे पाहूनच समाजकार्य करण्यास केव्हां केव्हां उद्युक्त होतों. प्रि. जोग यांची परमेश्वरावरील श्रद्धा-भक्ति मला 'शिरजोर' वाटली. तेव्हां त्यांनीं इतक्या आस्थेनें लिहिलेल्या इंग्रजी लेखाचें मातृभाषेंत रूपान्तर रा. रा. चिं. ग. कर्वे यांनीं करण्याचें पत्करल्यावर मला अतिशय आनंद झाला. परमेश्वरानें प्रि. जोग व रा. काकासाहेब कर्वे या दोघांना, सतत सार्वजनिक कार्य करण्याची आस्था असणाऱ्यांना, भरपूर आयुष्य तीं कार्यें करण्यास द्यावें, एवढीच प्रार्थना त्या जगान्नियंत्यापाशीं करून मी माझें हें मनोगत पुरें करतों.

शुभं भवतु ।

माडीवाले कॉलनी, पुणें २.
४ डिसेंबर १९४८

आपला नम्र
**मामा गरुड**

# प्रार्थनासमाज परिचय

## पार्श्वभूमि

पाश्चात्य शिक्षणाचे ज्या लोकांना फायदे मिळाले त्यांना या शिक्षणाच्या वाढीमुळें एक नवीन दृष्टि प्राप्त झाली; व तिनें त्यांची अशी खात्री पटवून दिली कीं, हिंदुस्थानच्या लोकांनीं एकत्र येऊन देशांत नवचैतन्य आणण्यासाठीं देशसेवेच्या विविध क्षेत्रांतून निष्ठेनें खपल्याखेरीज या प्राचीन राष्ट्राला सुखाचे दिवस येणार नाहींत. त्यांच्या मतें हे सुखाचे दिवस केव्हां येतील कीं जेव्हां सर्वत्र लोकांना देवाच्या ठिकाणीं पितृभाव व माणसांच्या ठिकाणीं बंधुभाव दिसूं लागेल. नवयुगाचा हाच संदेश होता व लोकांची अशी कल्पना होती कीं, ज्या स्त्रीपुरुषांना पाश्चात्य विचारांच्या संपर्कामुळें नवीन दृष्टि प्राप्त झाली आहे त्यांचें कर्तव्य हा संदेश देशाच्या प्रत्येक कानाकोपऱ्यांत पोंचविण्याचें आहे. हेंच ध्येय पुढें ठेवून राजा राममोहन रायांनीं १८२८ सालीं कलकत्त्यास ब्राह्मो समाजाची चळवळ सुरू केली.

## परमहंस सभा

नूतन शिक्षणाच्या वाढीमुळें पाश्चात्य शास्त्र आणि सुधारणा यांशीं संबंध येऊन गेल्या शतकाच्या सहाव्या दशकांत पश्चिम हिंदुस्थानांतल्या लोकांना वर सांगितलेला निष्कर्षच पटला. नवीन चळवळींच्या आघाडीवर असलेल्यांनीं जाती आणि पंथ यांसारखे सर्व भेदभाव नष्ट करण्यासाठीं परमहंस सभा नांवाची एक संस्था स्थापिली. आपल्या सभासदांना परस्पर विचारविनिमय करतां यावा म्हणून संस्था गुप्त रीतीनें चाले. पण लवकरच असें आढळून आलें कीं, या सभेसारख्या गुप्त संस्थांना नवीन विचार प्रसृत करण्याचें काम फारसें करतां येणें शक्य नव्हतें. ज्यांना स्वतः पटलेल्या मतांमुळें मनोधैर्य लाभलें आहे व जे आपली जी काय

धर्मश्रद्धा आहे ती उघड सांगण्याला तयार असतात अशा निष्ठावंत स्त्रीपुरुषांची, ईश्वराचें पितृत्व आणि मानवांचें भ्रातृत्व यांनीं प्रतीत झालेला ऐक्यधर्म स्वतः आचरण्यासाठीं व उपदेशिण्यासाठीं त्या वेळीं जरूरी होती. तेव्हां परमहंस सभा लवकरच मोडली गेली.

## प्रार्थनासमाजाची स्थापना

पण तिच्या सभासदांपैकीं जे अधिक निष्ठावंत होते ते एकत्र जमले व ब्राह्मो समाजाच्या ध्येयांनीं उत्स्फूर्त होऊन त्यांनीं मुंबई शहरांत १८६७ सालीं प्रार्थनासमाज या नांवानें अशीच एक धार्मिक चळवळ सुरू केली. ब्राह्मो समाजाप्रमाणेंच त्यांनीं या समाजाचे उद्देश आणि तत्त्वप्रणाली ठेविली; पण नांव बदललें. ईश्वरोपासनेचा अत्युच्च प्रकार म्हणजे जी प्रार्थना, व तीवर ज्यांचा विश्वास आहे अशांचा समुदाय तो प्रार्थनासमाज. या नवीन पंथाच्या संस्थापकांत डॉ. आत्माराम पांडुरंग, रा. बाळ मंगेश वागळे, रा. भास्कर हरि भागवत, रा. नारायण महादेव परमानंद, रा. वासुदेव बाबाजी नवरंगे, रा. भिकोबा लक्ष्मण चव्हाण यांसारखी मंडळी होती. डॉ. रा. गो. भांडारकर, न्या. मू मा. गो. रानडे, रा. वामन आबाजी मोडक व रा. शंकर पांडुरंग पंडित हे या मंडळींत लवकरच सामील झाले. न्या. मू. रानडे यांनीं 'एका आस्तिकाची आपल्या पंथासंबंधीं कैफियत' (ए थिइस्ट्स कॉन्फेशन ऑफ फेथ) या आपल्या प्रख्यात प्रबंधांत या नवीन धर्मपंथाचीं तत्त्वें विशद रीतीनें मांडून समाजाची बहुमोल सेवा केली. जेव्हां जेव्हां डॉ. भांडारकर ब्राह्मो समाजांतील तत्त्वांच्या धर्तीवर या नवीन पंथाचीं मुख्य तत्त्वें निःसंदिग्धपणें विवेचीत तेव्हां तेव्हां याच प्रबंधाचा पुष्कळसा उपयोग करीत.

## समाजाचीं मुख्य तत्त्वें

हीं मुख्य तत्त्वें अशीं विवेचिलीं होतीं कीं—

( १ ) परमेश्वरानें हें सर्व जग उत्पन्न केलें. तोच एक खरा देव. त्याशिवाय दुसरा देव नाहीं. तो नित्य, ज्ञानस्वरूप, अनंत, कल्याणनिधान, आनंदमय, निरवयव, निराकार, एकच, अद्वितीय, सर्वांचा नियंता, सर्वव्यापी,

सर्वज्ञ, सर्वशक्ति, कृपानिधि, प्रेमस्वरूप, परमपवित्र, पतितपावन असा आहे. ( २ ) केवळ त्याच्याच उपासनेच्या योगें येथें व परलोकीं शुभ प्राप्त होतें. ( ३ ) त्याच्यावर प्रीति, पूज्यबुद्धि व अनन्यभाव हीं ठेवून त्याप्रमाणें त्याचें मनांत भजनपूजन करणें व त्यास प्रिय अशीं कृत्यें करणें हीच त्याची खरी उपासना होय. ( ४ ) मूर्ति व इतर जड पदार्थ यांची पूजा किंवा प्रार्थना करणें हा ईश्वरोपासनेचा खरा प्रकार नव्हे. ( ५ ) परमेश्वर सावयवरूपानें अवतार घेत नाहीं व कोणताहि ग्रंथ साक्षात् ईश्वरप्रणीत किंवा सर्वांशीं प्रमाण नाहीं. ( ६ ) सर्व मनुष्यें एका परमेश्वराचीं लेंकरें आहेत, म्हणून भेद न राखतां परस्परांशीं बंधुभावानें वागावें हें ईश्वरास प्रिय आहे, आणि हें मनुष्याचें कर्तव्य आहे.

देवाच्या ठिकाणीं पितृभाव व माणसांच्या ठिकाणीं बंधुभाव या दोन मूलभूत कल्पना वरील तत्त्वांत गोंवलेल्या आहेत. या तत्त्वांमुळें देवाची कल्पना स्पष्ट होते व देव आणि माणूस यांची सेवा श्रद्धा आणि निष्ठा ठेवून करण्यास या तत्त्वांत सर्वांना बजावलें आहे. देवाचा नुसता बौद्धिक स्वीकार म्हणजे धर्म नव्हे, तर कुटुंबें आणि राज्यें यांत दैनंदिन काळ कंठतांना माणसांनीं आपला धर्म खराखुरा आचरिला पाहिजे, या गोष्टीवर वरील तत्त्वांचा भर आहे. माणसानें यथाशक्ति व यथाकाल दुसऱ्याची सेवा केल्यानेंच ईश्वराची उत्कृष्ट उपासना होते, हें या तत्त्वांमुळें स्पष्ट कळतें.

## कोणी पुरोहित नाहींत

समाजाचे कोणी नेमलेले पुरोहित नव्हते. सभासद स्वतःच सामाहिक उपासना चालवीत व दरसाल जेथें शक्य असेल तेथें समाजाविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्यांची मदत घेऊन समाजस्थापनेचा दिवस साजरा करीत. सर्व धर्मांच्या पवित्र ग्रंथांतून ते उपासनेसाठीं उतारे निवडून काढीत; पण साहजिकच ते उपनिषदें, गीता, पुराणें व हिंदुस्थानांत मध्ययुगांत ठिकाठिकाणीं होऊन गेलेल्या संत कवींचीं कवनें यांतूनच बहुधा निवड करीत. महाराष्ट्रांतील संत-कवींचीं गीतें व विशेषतः तुकारामाचे अभंग सर्रहा वापरले जात. समकालीन कवींचीं पदें आणि कविता यांचाहि उपयोग करीत.

## ब्राह्मो पुढाऱ्यांच्या भेटी

सुधारणाविषयक चळवळींना जे लोक चांगले अनुकूल होते त्यांच्यावर या नवीन धर्मपंथानें बरीच छाप बसविली हें खरें; पण त्याबरोबरच सनातनी वर्गाचा मोठाच विरोध ओढवून घेतला. जे सभासद या समाजाला मिळाले होते त्यांना आपल्या नवीन संप्रदायाविषयीं बराच उत्साह वाटत असला तरी पण त्यांच्यांत असे कित्येक जण होते कीं, त्यांना आपल्या दैनंदिन आयुष्यक्रमांत स्वतः मानीत असलेल्या धर्मतत्त्वांचें पालन करण्याची कांहींच आस्था वाटत नसे. तेव्हां समाजानें ब्राह्मो समाजाच्या नेत्यांना मुंबईस येण्याविषयीं निमंत्रण पाठविलें. उद्देश हा कीं, त्यांच्या सहवासानें प्रार्थनासमाजावरचा सभासदांमधील विश्वास दृढावेल व आपलीं मतें ठाम धारण करण्याचें धैर्य अंगीं येईल. तसेंच असाहि एक उद्देश होता कीं, या ब्राह्मो पुढाऱ्यांच्या आगमनामुळें पश्चिम हिंदुस्थानांत या नवीन संप्रदायाचा प्रसार होण्यास मदत होईल.

## ब्रह्मानंद केशवचंद्र सेन

त्याप्रमाणें १८६८ सालीं ब्रह्मानंद केशवचंद्र सेन हे मुंबईस आले. चार वर्षांपूर्वी म्हणजे प्रार्थनासमाजाची स्थापना होण्याच्या आधीं तीन वर्षें ते मुंबईला आले होते. त्या वेळीं मुंबईच्या लोकांना सट्ट्याच्या व्यवहारांत अलोट पैसा मिळाल्यानें ते केशवचंद्रांचा उपदेश ऐकण्याच्या मनःस्थितींत नव्हते. पण १८६८ ची परिस्थिति त्याहून निराळी, म्हणजे त्यांच्या स्वागताला अनुकूल अशी होती. त्यांचीं भाषणें, उपासना, चर्चा व यांहून जास्त म्हणजे त्यांचा समाजाच्या सभासदांशीं व इतरांशीं आलेला प्रत्यक्ष संबंध यांचा उत्कृष्ट परिणाम झाला; पण त्यांच्यासारख्या पुढाऱ्याला मुंबईंत जास्त दिवस राहाणें शक्यच नव्हतें, हें अगदीं उघड आहे.

## बाबू प्रतापचंद्र मुजुमदार

केशवचंद्रांच्या आगमनाच्या यशामुळें उत्तेजन येऊन, समाजानें बाबू प्रतापचंद्र मुजुमदार यांना मुंबईस येऊन कांहीं महिने राहाण्याविषयीं विनंति केली. त्याप्रमाणें बाबूजी मुंबईस आले व सहा महिने राहिले.

त्यांनीं प्रार्थनासमाज वाढीस लावण्याचें व या प्रांतांतील जनतेंत नवीन धर्मपंथाचा प्रसार करण्याचें बहुमोल कार्य केलें. त्यांनीं समाजाच्या सभासदांत आणि समाजाविषयीं सहानुभूति बाळगणाऱ्यांत नवीन जागृति उत्पन्न केली; व आपल्या समाजाची लवकर वाढ करावयाची असेल तर आपल्या कुटुंबियांना या नवीन पंथांत आपले भागीदार करून घेणें किती आवश्यक आहे याची खात्री पटवून घेण्यास मुजुमदारांनीं मदत केली. शिवाय त्यांनीं या नवीन पंथांशीं संलग्न असणाऱ्या कांहीं संस्थांची स्थापना करण्याच्या कामीं हातभार लाविला.

## समाजाला स्वतःची वास्तु

**प्रार्थनामंदिर**– बाबू प्रतापचंद्र मुजुमदार मुंबईत असतांनाच समाजाला स्वतःचें मंदिर असावें याविषयीं योजना आंखल्या होत्या. सध्याची मुंबईतील जागा विकत घेऊन २९ डिसेंबर १८७२ रोजीं मंदिराच्या पायाचा दगड बसविण्यांत आला. इमारतीचें काम १८७३ मध्यें सुरू होऊन पुढील सालीं पूर्ण झालें. जागा आणि इमारत मिळून एकंदर २६००० रु. लागले; व हे पैसे मंडळाचे सभासद आणि हितचिंतक यांकडून वर्गण्या घेऊन उभे केले.

## राममोहन आश्रम

मंदिराची जागा ऐसपैस होती तरी समाजाच्या सर्व कार्यांना पुरेशी इतकी नव्हती. तेव्हां अधिक जागेची सोय करणें प्राप्तच झालें. समाजाचे एक प्रमुख सभासद शेट दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला यांनीं याच आवारांत एक तीन मजली इमारत बांधून देण्याचें पत्करलें. त्यांनीं या नवीन इमारतीला आलेला खर्च १७००० रुपये देऊन शिवाय तिच्या डागडुजीसाठीं ६००० रु. आणखी वर दिले. या इमारतीचें नांव 'राममोहन आश्रम' असें ठेवण्यांत येऊन उद्घाटनसमारंभ १९०४ सालीं करण्यांत आला.

## मंदिरावर एक मजला

समाजाच्या कार्याचा व्याप जसा वाढत गेला व स्वतःच्या प्राथमिक आणि दुय्यम (इंग्रजी) शाळा जेव्हां उघडण्यांत आल्या तेव्हां मंदिर आणि

कै. ग. स. द. वा. पोतदार

राममोहन आश्रम यांतील जागा अपुरी पडूं लागली. तेव्हां १९२० सालीं समाजानें मंदिरावर एक मजला उठविला. एवढी जागाहि आज समाजाचें शैक्षणिक कार्य झपाट्यानें वाढत चालल्यामुळें अगदीं संकुचित वाटूं लागली आहे. त्यासाठीं अधिक जागा कोणत्या अत्युत्तम रीतीनें मिळवितां येईल याचा समाज विचार करीत आहे. श्रीमती डी. एन्. शिरूर यांनीं या योजनेसाठीं एक लाख रुपयांची देणगी देण्याचें नुकतेंच आश्वासन दिलें आहे.

## धर्मप्रचार-कार्य

**साधे प्रचारक**– प्रार्थनासमाजाच्या प्रारंभींच्या काळांत त्याचे धर्मप्रचारक असे कोणी नव्हते. आपल्या पंथाच्या प्रचारासाठीं साप्ताहिक उपासनेच्या वेळचीं प्रवचनें, व्याख्यानें, निरूपणें आणि समाजाच्या साध्या सभासदांनीं वार्षिक उत्सवांत व इतर वेळीं केलेलीं कीर्तनें यांवरच भर असे. या नवीन पंथाचा प्रांतांतील जनतेमध्यें प्रसार करण्याचा पद्धतशीर प्रयत्न ह्या वेळपावेतों कांहीं नव्हता.

## प्रचारनिधि

पण कालान्तरानें असें वाटूं लागलें कीं, समाजाच्या वाढीसाठीं धर्मप्रचाराच्या कार्याची कांहीं व्यवस्था करावयास पाहिजे. न्या. मू. रानडे यांनीं १८८१ सालीं अशी सूचना केली कीं, धर्मप्रचारनिधि गोळा करण्यासाठीं व आपल्या नवीन पंथाच्या प्रचारासाठीं सबंध वेळ काम करणारे धर्म-प्रचारक नेमण्यासंबंधीं कांहीं योजना ठरवावयास पाहिजेत. डॉ. भांडारकर व श्री. वा. आ. मोडक यांना ही कल्पना पटली व अनेक सभासदांचाहि पाठिंबा मिळून १८८१ सालच्या अखेरीस असा निधि उभारण्यास आला. पहिले धर्मप्रचारक म्हणून समाजानें श्री. सदाशिव पांडुरंग केळकर यांना १ जानेवारी १८८२ पासून नियुक्त केलें. श्री. केळकर यांनीं एका कापडाच्या गिरणींतील आपली चांगल्या पगाराची नोकरी सोडून सेवा आणि त्याग या बुद्धीनेंच हें काम पत्करिलें. त्यांनीं पुढें बारा वर्षेंपर्यंत प्रचाराचें काम केलें व समाजाची फार उपयुक्त सेवा केली.

# युनिटरियन शिष्यवृत्ती

ग्रेट ब्रिटन आणि अमेरिका या देशांतील युनिटरियन मंडळींचें लक्ष हिंदुस्थानांतील ब्राह्मोसमाज आणि प्रार्थनासमाज या संस्थांच्या धर्मविषयक चळवळीकडे वेधलें जाऊन त्यांनीं १८९५ सालीं रेव्ह. जे. टी. संडरलंड यांना मुद्दाम या संस्थांच्या पुढाऱ्यांशीं परिचय करून घेऊन त्यांच्या कार्याची माहिती आणण्यासाठीं इकडे पाठविलें. डॉ. संडरलंड हे मुंबई व इतर ठिकाणीं फिरले व त्यांनीं ब्रिटिश आणि फॉरिन युनिटरी असोसिएशनना अशी सूचना केली कीं, उदार धार्मिक मतांच्या हिंदी तरुणांना पुढील अभ्यासासाठीं इंग्लंडला जातां यावें म्हणून दोन शिष्यवृत्ती ठेवण्यांत याव्यात. त्यांची ही सूचना मान्य होऊन ब्राह्मो आणि प्रार्थना समाज यांतर्फे दोन लायक तरुणांना इंग्लंडमधील अभ्यासासाठीं मदत म्हणून दोन शिष्यवृत्तींची तरतूद करण्यांत आली. कलकत्त्यांतील तीन ब्राह्मो समाजांनीं नियुक्त केलेल्या समितीकडून उमेदवारांची निवड होई. १९०० सालीं प्रार्थनासमाजाला आपल्या सभासदांतून एक उमेदवार निवडून पाठविण्याची संधि मिळाली. त्याप्रमाणें एका शिष्यवृत्तीसाठीं श्री. मोतीबुलासा, बी. ए., यांची निवड करण्यांत आली. पण दुर्दैवानें ते इंग्लंडच्या वाटेवरच मृत्यु पावले. तेव्हां समाजानें त्याच्या जागीं श्री. विठ्ठल रामजी शिंदे यांची नेमणूक केली. श्री. शिंदे हे दोन वर्षें इंग्लंडांत राहिले व ऑक्सफोर्ड येथील मॅन्चेस्टर कॉलेजांत त्यांनीं शिक्षण घेतलें. ते १९०३ मध्यें हिंदुस्थानांत परत आल्यावर समाजानें त्यांना धर्मप्रचारक म्हणून नेमलें. त्यांनीं हें काम सात वर्षें केलें. शिंद्यांच्या नंतर श्री. वा. अ. सुखटणकर यांची इंग्लंडांतील उच्च शिक्षणासाठीं शिष्यवृत्तीच्या योजनेप्रमाणें निवड करण्यांत आली. ते दोन वर्षें ऑक्सफोर्ड येथें राहिले व एक वर्ष त्यांनीं जर्मनींत काढलें. ते १९०८ सालीं परत आल्यावर त्यांना धर्मप्रचारक नेमण्यांत आलें. त्यांनीं हें काम दोन वर्षें केल्यानंतर सोडून दिलें व प्रथम लाहोरच्या दयाळसिंग कॉलेजांत प्राध्यापक झाले व नंतर इंदूर संस्थानच्या शिक्षणखात्यांत नोकरी धरली.

त्यांच्यानंतर श्री. ग. य. चिटणीस यांना प्रार्थनासमाजानें युनिट-

रियन शिष्यवृत्ति देऊन पाठविलें. श्री. चिटणीस दोन वर्षें ऑक्सफोर्डला राहून १९२६ सालीं हिंदुस्थानांत परत आले. त्यांनीं कांहीं काळ धर्मप्रचाराचें काम केल्यानंतर सोडून दिलें व वृत्तपत्रव्यवसायांत पडले.

याप्रमाणें १८८१ मध्यें धर्मप्रचारनिधि उभारल्यापासून व युनिटेरियन शिष्यवृत्तीची सोय झाल्यापासून समाजानें एकसारखे धर्मप्रचारकांसाठीं केलेले प्रयत्न चिरकाल फलदायी झाले नाहींत. अधूनमधून योग्य तऱ्हेनें नेमलेल्या प्रचारकांची मदत मिळाली असली तरी लायक धर्मप्रचारकांचा वर्ग तयार करण्यांत त्याला यश आलें नाहीं हें खरें.

## ब्राह्मो समाजाचे धर्मप्रचारक

या कारणानें प्रार्थनासमाजाला आपल्या धर्मप्रचाराच्या कार्यांत ब्राह्मो समाजाच्या धर्मप्रचारकांवरच काय तें अवलंबून राहावें लागे. एका अर्थी त्यांच्या मदतीवर मुंबईचा कांहीं हक्कहि होता. कारण शेट दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला यांनीं मरणापूर्वीं ( १९१३ ) कांहीं दिवस कलकत्याच्या साधारण ब्राह्मो समाजाला पंडित शिवनाथशास्त्री यांच्या मार्फत धर्मप्रचारासाठीं म्हणून एक लाख रुपयांच्या देणगीची तरतूद करून ठेविली होती. तेव्हां प्रार्थनासमाजाला ब्राह्मो समाजाच्या धर्मप्रचारकांकडून अशी मदत वेळावेळीं हटकून मिळे. बाबू प्रतापचंद्र मुजुमदार यांनीं या बाबतींत परंपराच घालून दिली होती असें म्हणावें लागेल. ते इकडे दोनदां (१८७२ व १८७७ सालीं) येऊन गेले. त्यानंतर पं. शिवनाथशास्त्री यांनीं मुंबईस व-या प्रांतांतील इतर शहरांस दोन वेळां भेट दिली. लाहोर येथील ब्राह्मो समाजाचे बाबू अविनाशचंद्र मुजुमदार हे इकडे अनेक वेळ आले व समाजाच्या वार्षिक समारंभांत त्यांनीं भाग घेतला. त्यांच्याप्रमाणेंच बाबू सुधीरचंद्र बानर्जी, बाबू अमृतलाल बोस, भाई बलदेव नारायण व इतर परप्रांतीय कार्यकर्ते यांचीं नांवें सांगतां येतील.

ब्राह्मो समाजानें अगदीं अलीकडच्या काळांत श्री. विठ्ठल रामजी शिंदे यांच्या या प्रांतांतील प्रचारकार्यांत मदत दिली आहे व आतां त्यांच्या मृत्यूनंतरहि ब्राह्मो समाज या प्रांतांतील समाजाच्या कार्यकर्त्यांना त्यांच्या सवडीप्रमाणें धर्मप्रचार करण्यास मदत देत असतो.

## ब्राह्मो समाजाचा टपालानें धर्मप्रचार

श्री. वि. रा. शिंदे ऑक्सफोर्ड येथील मॅन्चेस्टर कॉलेजांत असतांना त्यांचा ब्रिटिश अँड फॉरिन युनिटरियन असोसिएशनच्या कार्याशीं अगदीं जवळून संबंध आला व टपालानें प्रचारकार्य करण्याची तिकडील कल्पना त्यांना फार आवडली. त्यांनीं ‘ ब्राह्मो पोस्टल मिशन ’ची योजना काढून ती पुण्याच्या श्री. वा. अ. सुखटणकर यांना कळविली. श्री. सुखटणकरांना ती पसंत पडून त्यांनीं ‘ ब्राह्मो पोस्टल मिशन ’ सुरू केलें. त्यांनीं श्री. शिंदे यांच्या मदतीनें युनिटरियन असोसिएशनकडून बरींच धार्मिक पुस्तकें आणि प्रबंध मोफत मिळविले व समाजाच्या पत्रांतील जाहिराती वाचून जे कोणी पुस्तकें मागवीत त्यांना टपालानें धाडून देत. लोकांकडून त्यांच्या आवडत्या धार्मिक विषयांवरील प्रश्न मागवून घेऊन टपालामार्फत त्यांचीं उत्तरेंहि ते पाठवीत. श्री. सुखटणकर इंग्लंडला गेल्यावर श्री. शिंदे यांनीं त्यांचें हें काम पुढें चालविलें. आठ वर्षें हें टपाली प्रचारकार्य चाललें होतें. त्या अवधींत ब्राह्मो धर्मपंथाच्या प्रसारासाठीं अनेक पुस्तकें, पत्रकें इ. मोफत वांटण्यांत आलीं होतीं.

## संलग्न संस्था

### दि बाँबे थीइस्टिक असोसिएशन—

ही संस्था १८७२ सालीं बाबू प्रतापचंद्र मुजुमदार यांच्या मदतीनें काढण्यांत आली. समाजाचे सभासद आणि ज्यांना या उदार धर्मपंथाविषयीं चांगली सहानुभूति वाटते अशा बाहेरच्या मंडळींना एकत्र आणण्याचा संस्थेचा उद्देश होता. संस्थेच्या मासिक सभा भरत व सभासद आणि इतर मंडळी यांना धार्मिक व इतर विषयांवर निबंध वाचण्यास व चर्चेंत भाग घेण्यास प्रोत्साहन दिलें जाई. स्त्रियांमध्ये सामान्य ज्ञानाची वाढ व्हावी या हेतूनें स्त्रियांच्या सभा सुरू करण्यांत आल्या. असोसिएशनचें कार्य कांहीं वर्षें चांगलें यशस्वी रीतीनें चाललें होतें; पण हळूहळू सभासद गळत गेले व कार्यें थंडावलीं आणि शेवटीं १८९९ सालीं संस्था बंद पडली. रात्रीच्या शाळा, ‘सुबोधपत्रिका’ साप्ताहिक यांसारखीं तिचीं कांहीं कार्यें समाजानें लागलींच पुढें चालविलीं.

**संगतसभा—**

दुसरी संलग्न संस्था म्हणजे १८८० सालीं निघालेली संगतसभा होय. हिच्या साप्ताहिक सभा भरत व सभासद आणि त्यांचे स्नेही-सोबती आध्यात्मिक, धार्मिक, नैतिक व सामाजिक मुद्द्यांवर वादविवाद करीत. या प्रकारच्या चर्चा सभासदांना आणि इतरांना समाजाच्या मूलभूत तत्त्वांचें विशदीकरण होण्यास उपयोगी पडत. अशा सभांतून चर्चिले गेलेले कांहीं विषय म्हणजे (१) ईश्वर आणि आत्मा, (२) प्रार्थना—तिचें स्वरूप आणि महत्त्व, (३) असत् म्हणजे काय, (४) ब्राह्मोधर्म आणि हिंदुधर्म, (५) धार्मिक भावनेचा प्रकार, (६) धर्म आणि जीवित, या प्रकारचे असत.

**आर्यमहिला समाज—**

समाजाची दुसरी संलग्न संस्था म्हणजे आर्यमहिला समाज होय. बाबू प्रतापचंद्र मुजुमदार जेव्हां १८७७ सालीं मुंबईस दुसऱ्यांदा आले तेव्हां त्यांनीं असें पाहिलें कीं, स्त्रियांमध्यें ज्ञानाचा प्रसार झाल्याखेरीज समाजाची वाढ होण्याची आशा नाहीं. तेव्हां त्यांनीं डॉ. सखाराम अर्जुन यांच्या मदतीनें मुंबईतील स्त्रियांमध्यें हें कार्य सुरू केलें. प्रथम प्रथम स्त्रियांपुढें पुरुषांचींच भाषणें होत व त्यांचा उद्देश स्त्रियांचें सामान्य ज्ञान वाढविण्याचा असे. कालान्तरानें अशा सभांतून निबंध वाचण्यासाठीं स्त्रीसभासद पुढें येऊं लागल्या. ता. १ मे १८८२ रोजीं आर्यमहिला समाजाची रीतसर स्थापना झाली तेव्हां या चळवळीला बराच जोर आला. आरंभापासून आर्यमहिला समाज उपयुक्त असें शैक्षणिक आणि सामाजिक कार्य करीत आला आहे. श्रीमती रमाबाई रानडे, लेडी लक्ष्मीबाई चंदावरकर, श्रीमती रमाबाई भांडारकर व कु. डॉ. काशीबाई नवरंगे या आर्यमहिला समाजांतील कांहीं प्रमुख कार्यकर्त्या सभासद होत.

**यंग थीइस्ट्स युनियन—**

यंग थीइस्ट्स युनिअन ही आणखी एक समाजाची संलग्न संस्था १९०५ सालीं स्थापन झाली. समाजांतील आणि बाहेरचे तरुण एकत्र आणण्याचा या संस्थेचा उद्देश होता. यूनियनच्या साप्ताहिक उपासना आणि संमेलनें होत. संस्थेतर्फे श्री. वि. रा. शिंदे ग्रंथाध्ययनाचे वर्ग चाल-

790.

वीत. शिवाय कांहीं सभासद् समाजसेवेचें कार्य करीत. तथापि अलीकडे यूनियनच्या कामांत शिथिलता आलेली दिसत आहे.

**रविवारची शाळा-**

समाजाचे सभासद आणि हितचिंतक यांच्या कुटुंबांतील मुलांबाळांना धार्मिक शिक्षण देणारी रविबारची शाळा ही समाजाची आणखी दुसरी संलग्न संस्था होय. समाजाच्या प्रारंभींच्या काळांत समाजाचे एक संस्थापक सभासद श्री. भिकोबा लक्ष्मण चव्हाण यांनीं ही शाळा सुरू केली व श्री. बाबण बापू कोरगांवकर या शाळेचे एक विद्यार्थी होत. त्यांना तेथें जें शिक्षण मिळालें त्याचा त्यांच्या मनावर कायमचा ठसा उमटला आहे. पुढें स्वतः कोरगांवकरांनींच या रविवारच्या शाळेचें काम आपल्या अंगावर घेतलें. आजहि असे पुष्कळजण सांपडतील कीं जे या रविवारच्या शाळेंत कोरगांवकरांकडून मिळत असलेल्या धार्मिक शिक्षणाचें अक्षय मोल किती होतें याची साक्ष पटवून देतील. श्री. कोरगांवकरांनंतर शाळेचें काम श्रीयुत ( आतां रावसाहेब ) वामनराव सोहोनी यांनीं पत्करलें. मग डॉ. सुखटणकर, कु. कृष्णाबाई जव्हेरे, कु. गद्रे व श्री. वि. ब. वेलणकर यांनीं पुढें चालविलें. नेहमींच्या शाळांतून मुलांना जें मुळींच मिळत नाहीं तें धार्मिक शिक्षण या रविवारच्या शाळेंत दिलें जातें. तेव्हां समाजाचे सभासद आणि हितचिंतक यांच्या कुटुंबांतील मुलांसाठीं संस्था उपयुक्त कार्य करीत आहे यांत शंका नाहीं.

## शैक्षणिक कार्य

**डॉ. भांडारकर मोफत पुस्तकालय व वाचनालय-**

अनेक वर्षांपासून प्रार्थनासमाज शिक्षणक्षेत्रांत फार बहुमोल कार्य करीत आला आहे. १८९७ सालीं शेट दामोदरदास गोवर्धनदास सुखडवाला यांनीं डॉ. भांडारकरांच्या नांवें एक मोफत पुस्तकालय व वाचनालय काढण्यासाठीं समाजाला ११०० रु. ची देणगी दिली. १९०२ सालीं त्यांनीं ग्रंथालयाला आणखी १००० रु. दिले. या ग्रंथालयांत तत्त्वज्ञान, धर्म, नीतिशास्त्र व वाङ्मय यांवरचे ग्रंथ आहेत.

**रात्रीच्या शाळा—**

वर संलग्न संस्था म्हणून उल्लेखिलेल्या मुंबई थीइस्टिक असोसिएशननें ज्यांना दिवसां पोटाचा व्यवसाय करावा लागत असल्यानें दिवसांच्या शाळांतून शिक्षण घेतां येत नाहीं अशा कामकऱ्यांना शिक्षणाच्या सोयी करून देण्याच्या उद्देशानें रात्रीच्या शाळा उघडल्या. अशी एक रात्रीची शाळा अस्पृश्य वर्गासाठीं १८९१ सालीं उघडण्यांत आली. त्या वेळीं श्री. कोरगांवकर हे रात्रीच्या शाळांच्या समितीचे चिटणीस होते. १८९९ सालीं थीइस्टिक असोसिएशन बंद पडली तेव्हां या रात्रीच्या शाळांची जबाबदारी समाजानें पत्करली. श्री. सोहोनी यांना शाळांचे मुख्याध्यापक नेमण्यांत आलें व त्यांनीं आपलें काम चांगल्या रीतीनें केलें. श्री. सोहोनी यांनीं हें काम सोडल्यावर श्री. वेलणकर त्यांच्या जागीं आले. या रात्रीच्या शाळांनीं सर्व जातींच्या, सर्व धर्मांच्या आणि व्यवसायांच्या प्रौढ माणसांची गरज भागविण्याचें कार्य केलें आहे व त्यांचें हें कार्य आतां इतर सामाजिक संस्था बरेंचसें करीत आहेत व सध्यां समाज एकहि रात्रीची शाळा चालवीत नाहीं. तथापि समाज-सेवेच्या या क्षेत्रांत आपण पुरोगामी आहोंत असा दावा समाजाला अवश्य सांगतां येईल.

**स्टूडंट्स ब्रदरहूड—**

प्रो. एन्. जी. वेलिंगकर आणि श्री. भा. स. तर्खड या समाजा-च्या दोन सभासदांनीं 'स्टूडंट्स ब्रदरहूड' नांवाची एक संस्था काढली. विश्वविद्यालयाच्या विद्यार्थ्यांमध्यें सामाजिक आणि शैक्षणिक कार्य करण्याचा संस्थेनें उद्देश ठेवला होता. ब्रदरहूडचे साप्ताहिक वर्ग समाजाच्या प्रार्थनामंदिरांत भरत व ते पाळीपाळीनें सर नारायणराव चंदावरकर आणि प्रो. वेलिंगकर हे चालवीत. ही ब्रदरहूड संस्था लव-करच विद्यार्थ्यांना आवडूं लागली. ही प्रत्यक्ष समाजानें काढलेली संस्था नसली तरी समाजाच्या सभासदांनीं हिची स्थापना करून अनेक वर्षें चालविली होती.

**राममोहन इंग्लिश स्कूल—**

१९१७ सालीं प्रार्थनासमाजाचा सुवर्णमहोत्सव साजरा करण्यांत आला.

समाजाचे त्या वेळचे चिटणीस श्री. गिरिजाशंकर त्रिवेदी यांच्या मनांत असें आलें कीं, या सुवर्णमहोत्सवाचें स्मारक म्हणून समाजानें स्वतःची एक इंग्रजी शाळा चालवावी. या शाळेचा प्रारंभींचा खर्च भागविण्या-साठीं श्री. त्रिवेदी यांनीं पांच हजार रुपयांची देणगी दिली. त्रिवेदींची ही योजना समाजानें मान्य करून त्याच सालीं समाजाच्या राममोहन आश्रमांत मुलांमुलींची एक इंग्रजी शाळा उघडली व तिला 'राममोहन इंग्लिश स्कूल' असें नांव दिलें. प्रारंभींच्या शिक्षकांत श्री. दे. वि. श्रीखंडे, श्री. ब. गं. गद्रे व कु. कृष्णाबाई जव्हेर ही मंडळी होती. नेहमींच्या शाळेच्या अभ्यासाच्या जोडीनें विद्यार्थ्यांना धार्मिक शिक्षणहि द्यावयाची योजना होती. पहिल्या वर्षी फक्त तीन इयत्तांचे वर्ग चालविले. पुढें १९२३ सालापर्यंत मुंबई विद्यापीठाच्या मॅट्रिक परीक्षेपावेतों शिक्षण देणारें हायस्कूल होण्यापर्यंत या शाळेची प्रगति झाली. या वेळीं श्री. वामनराव सोहोनी शाळेचे मुख्याध्यापक झाले. ही शाळा विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्या आवडीची होऊन जागा पुरेनाशी झाली. तेव्हां १९२९ सालीं समाजानें मंदिरावर एक मजला वाढविला. या मजल्याचा खर्च समाजाला सभासदांनीं आणि हितचिंतकांनीं दिलेल्या देणग्यांतून भागला. हा निधि (९५००० रु.) जमविण्याच्या कामीं सर नारायण चंदावरकर, श्री. बळवंतराव माडगांवकर, श्री. बा. बा. कोरगांवकर व श्री. ज. गं. गद्रे यांची फार मदत झाली. हा एक मजला वाढवूनहि शाळेच्या वाढीला जागेची अडचण भासतच आहे. मुंबईतील उत्कृष्ट शाळांपैकीं ही एक आहे असें विद्यार्थी, पालक व शिक्षणाधिकारी यांचें मत झालें आहे. साहजिकच दरसाल प्रवेश मिळण्यासाठीं विद्यार्थ्यांची पुष्कळ गर्दी होते. सध्यां या शाळेंत ८०० वर विद्यार्थी असून शाळा सकाळ दुपार भरते व स्वतःच्या जागेखेरीज दोन भाड्याच्या इमारती वापराव्या लागत आहेत. सध्याचे शाळेचे प्रमुख श्री. जी. एल्. चंदावरकर आहेत.

**राममोहन इंग्लिश स्कूल नं. २, दादर—**

अलीकडच्या काळांत मुंबईची उत्तर बाजूस वाढ झाली असून विस्तृत उपनगरें वसलीं आहेत. दादर हें त्यांपैकीं एक आहे. या भागांतील गरज भागविण्यासाठीं समाजांत सहा वर्षांपूर्वी वरील शाळेचीच एक

शाखा दादरला उघडली. ही शाळा सध्यां भाड्याच्या जागेत भरते. पण तिची प्रगति झपाट्यानें होत असल्यानें जास्त जागेची अत्यंत जरूरी भासत आहे.

**सर नारायण चंदावरकर प्राथमिक शाळा—**

राममोहन इंग्लिश स्कूलला पोषक म्हणून एका प्राथमिक शाळेची फार आवश्यकता होती म्हणून समाजानें एक आधींच चालू असलेली प्राथमिक शाळा १९२४ सालीं आपल्याकडे घेतली व तिला 'सर नारायण चंदावरकर प्रायमरी स्कूल' असें नांव ठेविलें श्री. व्ही. बी. वेलणकर हे शाळेचे हेडमास्तर म्हणून काम करीत असून त्यांच्या देखरेखीखालीं शाळेची हळूहळू प्रगति होत आहे व आज मुंबईंत ती एक खरोखरी चांगली प्राथमिक शाळा म्हणून समजण्यांत येते. सध्यां शाळेच्या पटावर ३५५ मुलें आहेत. शाळा भाड्याच्याच जागेंत भरते व स्वतःची सोयीची इमारत नसल्यानें तिची फार तारांबळ उडत आहे.

समाजाचें एवढें शैक्षणिक कार्य पाहून त्याच्या सभासदांना आणि हितचिंतकांना धन्यता वाटते. कै. वामन वासुदेव नवरंगे यांच्या नांवानें शिष्यवृत्ति ठेवण्यासाठीं नवरंगे कुटुंबानें १०००० रुपये समाजाच्या हवालीं केले. इतर सभासदादि मंडळींनींहि विद्यार्थ्यांसाठीं शाळेंत मासिक शिष्यवृत्ति ठेवल्या आहेत.

## मानवहितैषी व सामाजिक कार्य

**बालहत्याप्रतिबंधक गृह—**

प्रार्थनासमाजाचे एक सभासद रावबहादूर लालशंकर उमियाशंकर हे पंढरपुरास मुन्सफ असतांना १८७५ सालीं त्यांनीं आपल्या कांहीं मित्रांच्या मदतीनें बालहत्याप्रतिबंधक संस्था काढली. त्या वेळीं सबंध हिंदुस्थानांत अशा तऱ्हेची ही एकच संस्था होती. प्रार्थनासमाजानें १८८१ सालीं ही संस्था स्थानिक समितीकडून आपल्याकडे घेतली. तिलाच जोडून एक प्रसूतिगृह काढलेलें आहे. टाकलेलीं मुलें व प्रसूतिगृह सोडतांना आयांनीं दिलेलीं आपलीं मुलें यांचें संगोपन व संवर्धन करण्याची जबाबदारी संस्था अंगावर घेते. आतांपर्यंत संस्थेनें शेकडों अनाथ मुलांची काळजी वाहिली आहे. सध्यां या गृहांत मुलांची संख्या ५८ आहे.

**पंढरपूर अनाथ बालकाश्रम–**

१८७७ सालच्या मोठ्या दुष्काळांत अनाथ झालेल्या मुलांचें संगोपन करण्यासाठीं बालहत्याप्रतिबंधक गृहाला जोडूनच रा. ब. लालशंकर उमियाशंकर यांनीं पंढरपूर येथें एक अनाथबालकाश्रम काढलेलें होतें. तेंहि गृहाबरोबरच समाजानें आपल्याकडे घेतलें. बा. ह. प्र. गृहानें सांभाळण्यासाठीं सोंपविलेलीं मुलें या आश्रमांत असतात. १९२४ चा बॉंबे चिल्ड्रन्स ॲक्ट या कायद्यान्वयें स्थापलेल्या ज्युव्हेनाईल कोर्टाकडून आलेलीं मुलें १९३८ पासून गृहांत घेतलीं जातात. सध्यां एकंदर मिळून मुलें १२० आहेत.

**प्रसूतिगृह—**

अनुभवानें असें आढळून आलें होतें कीं, बालहत्याप्रतिबंधक गृहानें कितीहि काळजी घेतली तरी टाकलेल्या मुलांपैकीं पुष्कळशीं फार दिवस जगत नाहींत; याचें कारण त्यांच्या आयांची बाळंतपणापूर्वी काळजी घेतली जात नाहीं. तेव्हां समाजानें एक प्रसूतिगृह काढलें. त्यांत कोणीं कुमार्गास लाविल्यामुळें संकटांत सांपडलेल्या विधवा, कुमारिका व नवऱ्यांनीं टाकलेल्या बायका यांना घेतलें जातें. हिंदुस्थानच्या सर्व भागांतील सर्व धर्मांच्या आणि जातींच्या शेकडों अभागी स्त्रियांना या प्रसूतिगृहानें आश्रय दिलेला आहे. या अभागी स्त्रियांची बाळंतपणापूर्वी जरूर ती सर्व काळजी गृहांत घेतली जाऊन त्यांच्या प्रसूतीनंतर त्यांच्या मुलांचेंहि संगोपन येथें होतें. पालक घेऊन जाईपर्यंत स्त्रियांना या गृहांत राहूं दिलें जातें. जातांना त्या मुलें ठेवून जातात व त्यांचा सांभाळ बा. ह. प्र. गृह करतें.

**अनाथस्त्रीगृह—**

प्रसूतिगृहांतील कांहीं स्त्रियांना त्यांचे पालक घेऊन जात नाहींत व त्यामुळें त्यांना घरदार उरत नाहीं. त्यांच्या तरतुदीसाठीं पंढरपूर येथील वरील संस्थांच्या सहकार्यानें एक अनाथस्त्रीगृह चालविण्यांत येत असतें. ज्या स्त्रियांना कोर्टांनीं बालहत्येच्या आरोपाखालीं शिक्षा दिलेली असून सरकारनें या गृहांत राहाण्याच्या अटीवर ती रद्द करून घेतली असते अशा सरकारकडून आलेल्या स्त्रियांना गेल्या कांहीं वर्षांपासून या गृहांत घेण्यांत येत असतें. अशा स्त्रियांना साधें शिक्षण व नवीन आयुष्याला

सुरुवात करण्याच्या दृष्टींनें पोटाचा सन्मान्य उद्योग करतां यावा म्हणून दुसरें उपयुक्त शिक्षण देण्याच्या सोयी या गृहांत केल्या आहेत. आज या गृहांत ज्यांना कोणी पालक नाहींत अशा आठ स्त्रिया व इतर सहा आहेत.

**वरील संस्थांसाठीं इमारती—**

१८७८ सालीं समाजानें मुंबईचे एक गिरणीवाले शेट चतुर्भुज मुरारजी यांनीं देणगी दिलेल्या ११००० रुपयांतून एक इमारत बांधली. त्यानंतर पुढें या इमारतीला जोडून आणखी कांहीं बांधकाम सार्वजनिक देणग्यांतून करण्यांत आलें.

वरील संलग्न संस्था वाढल्या तशा होत्या त्या इमारतींत जागा अपुरी होऊं लागली. तेव्हां समाजानें या संस्थांसाठीं पंढरपूर येथें नवीन ऐसपैस जागेची इमारत बांधली व तिला लागलेला खर्च सार्वजनिक देणग्यांतून भरून काढला. श्रीमती रमाबाई नवरंगे यांनीं ३०००० रुपयांची व श्रीमती रामचंद्र लालजी यांनीं २०००० रुपयांची देणगी या नवीन इमारतखर्चासाठीं दिली. या दात्यांचे उतराई होण्यासाठीं समाजानें बालकाश्रमाला श्रीमती नवरंगे यांचे श्वशुर व समाजाचे एक संस्थापक सभासद वासुदेव बाबाजी नवरंगे यांचें नांव दिलें व तळमजल्यावरील मुलांच्या दिवाणखान्याला रामचंद्र लालजी यांचें नांव दिलें.

पंढरपूरच्या अनाथ बालकाश्रमांत त्यांतील मुलांना शिक्षण आणि वळण देण्यांत येत असतें. मुलींनाहि आश्रमांत घेण्यांत येऊन स्थानिक शाळांतून त्यांच्या अभ्यासाची सोय करण्यांत येते. या वर्षी आश्रमांतील एक मुलगी मॅट्रिक परीक्षेंत उत्तीर्ण होऊन कॉलेजांत शिकत आहे. आश्रमांतील अनेक मुलींना चांगलीं स्थळें मिळून त्या आतां सुखाचें आयुष्य कंठीत आहेत.

**डी. एन्. शिरूर आश्रम—**

मुलें लहान आहेत तोंपर्यंत स्थानिक शाळांतून शिकतात पण जेव्हां तीं मोठीं होतात तेव्हां त्यांना पुढील शिक्षणासाठीं बाहेर समाजानें चालविलेल्या आश्रमांत पाठविलें जातें. १९३२ सालीं समाजानें यासाठींच हा आश्रम काढला. मागें मुंबईचे एक इमारत कॉन्ट्रॅक्टर श्री. बाळकृष्ण महादेव साळवी यांनीं विलेंपार्लें येथें जी जागा समाजाला

बक्षीस दिली होती ती आणि शेजारील जागा यांवर एक लहान इमारत बांधण्यांत आली होती. नुकतीच श्रीमती डी. एन्. शिरूर यांनीं आपल्या पतीच्या नांवानें १०००० रुपयांची या आश्रमाला देणगी दिली म्हणून त्यांचें नांव आश्रमाला देण्यांत आलें आहे. आश्रमांत चाळीस मुलांची सोय आहे. सध्यां २९ मुलें राहतात व गांवांतील शाळांतून शिकतात. या आश्रमांत उद्योगधंद्यांचेंहि शिक्षण दिलें जातें. मासिक खर्च सुमारें ७०० रु. पर्यंत येतो.

पंढरपूर आणि मुंबई या ठिकाणीं इतकीं वर्षें समाजानें मानवहितार्थ चालविलेल्या संस्थांतून जात, वर्ण किंवा पंथ हे भेद लक्ष्यांत न घेतां सेवेचेंच कार्य करण्यांत येत आहे. देशाच्या सर्व भागांतून गरजू लोक यांचा फायदा घेतात. श्री. वै. सी. जव्हेरे हे आश्रमाचे प्रमुख असून त्यांच्या मदतीला डॉक्टर, मेट्रन व ६ नर्स आहेत. या संस्थांसाठीं दरमहा समाजाला मोठा खर्च सोसावा लागतो. यापैकीं बराचसा संस्था पाहावयास येणाऱ्या लोकांकडून व पंढरपूरला देवदर्शनासाठीं येणाऱ्यांकडून मिळणाऱ्या देणग्यांतून भागविला जातो. उरलेला खर्च मुंबई व इतर ठिकाणीं जमणाऱ्या वर्गणींतून होतो. अलीकडे मुंबई सरकार दरसाल २००० रुपयांची मदत करीत असतें. तरीसुद्धां सध्यांच्या महागाईमुळें संस्थांचा खर्च महिना ६००० रुपयांपर्यंत जात असल्यानें या वर्गण्या आणि देणग्या पुऱ्या पडत नाहींत. तेव्हां समाजाला पूर्वीं मिळालेल्या शिल्लक देणग्यांतून तूट भरून काढावी लागते व यामुळें शिल्लक झपाट्यानें घटत चालली आहे.

### दि डिप्रेस्ड क्लासेस मिशन—

आपल्यांतील बऱ्याच मोठ्या वर्गांना अस्पृश्य आणि अंत्यज गणल्यानें हिंदुसमाजाला कलंक लागला होता. हा हिंदुसमाजावरचा कलंक धुवून काढण्यासाठीं आपलें सर्व सामर्थ्य खर्ची घालण्याचें कर्तव्य सुसंस्कृत लोकांनीं केलें पाहिजे असें प्रार्थनासमाजाच्या पुढाऱ्यांचें नेहमीं मत असे. प्रार्थनासमाजाच्या धर्मप्रचाराचें कार्य करीत असतांनाच या दुर्दैवी लोकांच्या उद्धारासाठीं एक मिशन काढण्याची कल्पना श्री. वि. रा. शिंदे



श्री. म. म. द. वा. पोतदार
ग्रंथ संग्रह

यांच्या मनांत उद्भवली. तेव्हां त्यांनीं त्या वेळचे समाजाचे अध्यक्ष सर नारायण चंदावरकर यांच्या मदतीनें १९०६ सालीं हें मिशन सुरू केलें व त्याला 'दि डिप्रेस्ड क्लासेस मिशन' असें नांव दिलें. मुंबईतील समाजाचें धर्मप्रचारकार्य सोडून दिल्यावर श्री. शिंदे यांनीं स्वतःला या कार्याकरितांच वाहून घेतलें. त्यांच्या या कार्यास श्री. वा. स. सोहोनी, मि. ए. एम्. सय्यद व समाजाचे इतर सभासद यांनीं हातभार लाविला. मिशननें अस्पृश्यांसाठीं परेळ येथें एक वसाहत स्थापिली व तींत उत्तम शिक्षणकार्य चालविलें. समाजाचे एक सभासद श्री. ए. के. मुदालियार यांनीं पुण्यास या मिशनची एक शाखा सुरू केली. मिशनपुढें फार अवघड कार्य होतें. तें लोकप्रिय तर मुळींच नव्हतें. तसेंच देशांतील राजकीय पक्षांचें या प्रश्नाकडे लक्ष ओढून घेण्याचें कार्यकर्त्यांना साधत नव्हतें. तथापि त्यांनीं आपला कार्यावरील विश्वास ढळूं न देतां मोठ्या निष्ठेनें कामाची चिकाटी ठेविली. त्यांच्या या श्रमामुळेंच देशांत विशिष्ट भूमिका तयार होऊन महात्मा गांधींच्या नेतृत्वाखालीं कॉंग्रेसनें हें अंत्यजोद्धाराचें कार्य पत्करलें. अस्पृश्यांकडे पाहाण्याची लोकांची दृष्टि बदलण्याचें श्रेय महात्मा गांधी व त्यांचे सहकारी कार्यकर्ते यांना देतांना आपण अशी दृढ आठवण ठेविली पाहिजे कीं, प्रार्थनासमाजाचे भांडारकर, रानडे, चंदावरकर, सुखडवाला, कोरगांवकर यांसारखे पुढारी व या सर्वांहून अधिक म्हणजे श्री. वि. रा. शिंदे हे या क्षेत्रांतील आद्य कार्यकर्ते होत.

## वृत्तपत्र आणि प्रकाशनें

**सुबोधपत्रिका—**

सुबोधपत्रिका नांवाचें प्रार्थनासमाजाचें एक इंग्रजी-मराठी साप्ताहिक आज ७५ वर्षांवर चालू आहे. प्रथम हें १८७३ सालीं बॉंबे थीइस्टिक असोशिएशननें काढलें. असोशिएशन बंद पडल्यावर १८९९ सालीं प्रार्थनासमाजानें तें आपल्याकडे घेतलें व तेव्हांपासून चालविलें आहे. या पत्रांत लिहिणाऱ्या लेखकांत डॉ. रा. गो. भांडारकर, न्या. मू. मा. गो. रानडे, रा. ब. शंकर पांडुरंग पंडित, श्री. आर्. व्ही. माडगांवकर, श्री. दिनानाथ वि. माडगांवकर, श्री. वासुदेव जी. भांडारकर,

सर नारायण चंदावरकर, प्रो. श्री रा. भांडारकर, श्री. ज. ना. परमानंद, श्री. वा. स. सोहोनी व श्री. यज्ञेश्वरपंत भांडारकर यांचीं नांवें सांगता येतील. आरंभीं श्री. नारायण महादेव परमानंद हे त्याचे संपादक होते. १८९७ पासून संपादकीय जबाबदारी श्री. द्वा. गो. वैद्य यांनीं सांभाळली व ते १९४० सालीं त्यांचें निधन होईपर्यंत ते सुबोधपत्रिकेचे सारखे संपादक होते. पत्रिकेची इंग्रजी बाजू भरण्याच्या कामीं श्री. वैद्य यांना बऱ्याच मित्रांची चांगली मदत मिळे. त्यांमध्यें प्रो. व. ना. नाईक यांचा प्रामुख्यानें उल्लेख करावा लागेल. प्रार्थनासमाजांतील व बाहेरच्या थोर मंडळींच्या लेखामुळें पत्रिकेनें चांगलें नांव मिळविलें आहे. तसेंच तिच्यांतील धार्मिक, सामाजिक आणि कधीं कधीं राजकीय विषयांवरील विचारवंत संपादकीय स्फुटांमुळेंहि तिला वजन प्राप्त झालें आहे. कै. वैद्य संपादक असतांना तिचा लौकिक आस्ते आस्ते वाढत गेला. प्रासंगिक विषयांवरील त्याचे लेख आणि टीका नेहमीं स्पष्ट आणि निर्भय असूनहि त्यांत भारदस्तपणा आणि सौजन्य प्रतीत होई. त्यांच्यानंतर संपादक झालेले सध्याचे श्री. ग. ल. चंदावरकर यांनीं जुना लौकिक टिकविला आहे. प्रो. व. ना. नाईक हे पूर्वीप्रमाणेंच इंग्रजी विभागांत लिहितात.

तथापि हें वृत्तपत्र कधींच फायद्यांत नव्हतें. अलीकडच्या काळांत तर तें चालविण्यासाठीं एक निधि तयार करावा लागला. कै. वैद्यांनीं आपली ३००० रु. ची विम्याची पॉलिसी या निधीला अर्पण करून समाजावरील आणि तिच्या पत्रिकेवरील आपली थोर निष्ठा त्यागानें दर्शित केली. इतरांनींहि या निधीसाठीं देणग्या दिल्या व आतां तींत १३,८०० रुपये जमले आहेत. पण पत्रिकेची तूट भरून निघण्याइतकें या रकमेपासून उत्पन्न निघत नाहीं. त्यामुळें समाजाला दरसाल मोठी तूट सोसावी लागते.

**पुढाऱ्यांचे लेख आणि प्रवचनें—**

या सुबोधपत्रिकेंतील अंकांत प्रसिद्ध झालेले प्रार्थनासमाजाच्या पुढाऱ्यांचे लेख आणि प्रवचनें यांचे बरेच मोठाले ग्रंथ तयार झाले. त्यांपैकीं बऱ्याच ग्रंथांचें प्रकाशन पत्रिकेचे संपादक श्री. वैद्य यांनींच केलें. त्यांनीं बारकाईनें पत्रिकेच्या जुन्या फायली चाळल्या; लेख आणि उपासना-प्रवचनें यांची निवड केली व मोठ्या परिश्रमानें छापण्यासाठीं ग्रंथांचीं हस्तलिखितें

तयार करून तीं छापूनहि काढलीं. वैद्यांच्या या ग्रंथासंबंधींच्या एकनिष्ठ परिश्रमांमुळें पुढील पिढ्यांना या धर्मपंथाच्या थोर पुढाऱ्यांनीं व्यासपीठावरून केलेले स्फूर्तिदायक उपदेश (जे नंतर पत्रिकेंत प्रसिद्ध झाले) व पत्रिकेसाठीं लिहिलेले महत्त्वाचे लेख यांचा लाभ झाला आहे. या ग्रंथप्रकाशनांत (१) न्या. मू. रानडे यांचीं धर्मपर व्याख्यानें व (२) डॉ. रा. गो. भांडारकर यांचे धर्मपर लेख व व्याख्यानें हीं असून त्यांचें संपादकीय आणि प्रकाशनकार्य श्री. वैद्य यांनींच केलें आहे.

श्री. वैद्य यांनीं घालून दिलेला कित्ता इतरांनीं गिरविला. पुण्याचे श्री. रा. भि. जोशी यांनीं कै. वामन आबाजी मोडक यांच्या धर्मपर आणि नीतिपर व्याख्यानांचा एक खंड प्रसिद्ध केला; तसेंच श्री. ब. भ. केसकर यांनीं सर नारायण चंदावरकर यांनीं समाजाच्या व्यासपीठावरून इंग्रजींत चालविलेल्या उपासनांचें मराठींत भाषांतर करून एक ग्रंथ बाहेर काढला. श्री. केसकरांनींच श्री. वि. रा. शिंदे यांच्या प्रवचनांचा आणि लेखांचा एक संग्रह प्रसिद्ध केला आहे. समाजाच्या व्यासपीठावरून इतर अनेक उपासकांचीं झालेलीं प्रवचनेंहि त्यांनीं पांच भागांत छापून काढलीं. नुकताच या केसकरांनीं कै. द्वा. गो. वैद्य यांचे स्वतःचे लेख आणि प्रवचनें संग्रहित केलेला 'संसार व धर्मसाधन'* या नांवाचा एक ग्रंथ प्रसिद्ध केला आहे.

या पंथाच्या पुढाऱ्यांचे लेख आणि प्रवचनें ज्यांत संकलित केलीं आहेत तीं हीं पुस्तकें म्हणजे या नूतन धर्मपंथाचीं तत्त्वें आणि दृष्टिकोण यांसंबंधीं माहिती देणारें महत्त्वाचें साधनच होय. हीं पुस्तकें समाजांतील मंडळींनींच आवडीनें वाचलीं असें नसून बाहेरच्या लोकांनाहि तीं पसंत पडलीं. न्या. मू. रानडे यांच्या धर्मपर व्याख्यानांच्या चार व डॉ. भांडारकर यांच्या धर्मपर लेख-व्याख्यानांच्या तीन आवृत्ती आतांपर्यंत निघाल्या आहेत.

**प्रार्थनासमाजाचा इतिहास—**

समाजाचें दुसरें महत्त्वाचें प्रकाशन म्हणजे श्री. द्वा. गो. वैद्य यांनीं लिहून १९२७ सालीं प्रसिद्ध केलेला प्रार्थनासमाजाचा इतिहास होय. या पुस्तकाच्या पहिल्या भागांत श्री. वैद्य यांनीं समाजाचा उगम आणि वाढ यांविषयीं सुसंगत वृत्तान्त देऊन त्याच्या विविध कार्यांची माहिती

म/१७५७९

करून दिली आहे; व दुसऱ्या भागांत या पंथाच्या कांहीं पुढाऱ्यांचीं लहान चरित्रें दिलीं आहेत. वैद्यांच्या या पुस्तकानें समाजाच्या कारकीर्दींतील अनेक घटना उजेडांत आल्या आहेत; एरवीं त्या निरंतर अंधारांतच राहात्या.

श्री. वैद्य यांनीं मरणाच्या आधीं कांहीं थोड्या वर्षांपूर्वी सर नारायण चंदावरकर यांचें एक मोठें विस्तृत व गुणग्रहणपर चरित्र लिहून प्रसिद्ध केलें होतें. हा मोठा ग्रंथ पाहून, लेखकाला चारित्राविषयक माहिती गोळा करून ती सुंदर रीतीनें मांडण्यासाठीं किती श्रम करावे लागले असतील याची कल्पना येते.

**प्रार्थनासंगीत—**

समाजाच्या ग्रंथमालेंत 'प्रार्थनासंगीत' नांवाच्या कवनसंग्रहाला महत्त्वाचें स्थान द्यावें लागेल. या 'संगीत' पुस्तकांत मध्ययुगीन साधुसंत आणि कवी यांचीं निवडक पदें तर आहेतच पण त्यांच्या जोडीला आजच्या कवींचींहि भक्तिपर कवनें घेतलीं आहेत. या पुस्तकाच्या सात आवृत्ती प्रसिद्ध झाल्या यावरूनच समाजांतील व बाहेरच्या मंडळींनाहि त्याची किती आवड आहे हें दिसून येईल. यांत ३८१ पदें व ६७७ अभंग (नामदेव, एकनाथ, रामदास, तुकाराम इत्यादींचे) व इतर अनेक भाविक गीतें आणि पदें आहेत.

याची लहान आटोपशीर आवृत्ति म्हणून श्री. वैद्य यांनीं 'सुलभ भजनसंग्रह' प्रसिद्ध केला. यांत 'प्रार्थनासंगीतां'तून निवडक पदें घेऊन शिवाय अर्वाचीन कवींच्या ग्रंथांतूनहि उतारे निवडून दिले आहेत.

समाजाच्या याखेरीज इतर प्रकाशनांमध्यें 'प्रार्थनासंग्रह' नांवाचा उपासनांचा संग्रह व या नवसंप्रदायाच्या प्रसारासाठीं वेळोवेळीं प्रसिद्ध केलेलीं लहान लहान धार्मिक पुस्तकें यांचा उल्लेख करणें जरूर आहे.

## मुंबईबाहेर पंथप्रचार

**पुणें प्रार्थनासमाज—**

मुंबईबाहेर पुणें, अहमदाबाद, अहमदनगर व अलीकडच्या काळांत वाई (सातारा जिल्हा) या ठिकाणीं पंथाचीं मुळें लवकर रुजलीं. शिवाय

गुजरात आणि दख्खन या भागांतील इतर शहरांतून अधूनमधून त्यास पाठिंबा मिळे. १८७० सालच्या डिसेंबर महिन्यांत कांहीं थोड्या निष्ठावंत मंडळींनीं एकत्र येऊन पुण्यास एक प्रार्थनासमाज स्थापन केला. त्यांच्यांत श्री. वामन आबाजी मोडक यांनीं या संप्रदायासंबंधीं भक्तीची ज्योत पेटाविली होती. अर्वाचीन काळांत पुणें हें सतत विद्येचें केंद्र बनत गेलें असून मुंबईखालोखाल पुण्याला महत्त्व आलेलें आहे. न्या. मू. रानडे यांचें हें वसतीस्थान असून डॉ. भांडारकर हे १८९२ सालीं सरकारी नोकरींतून मुक्त झ ल्यानंतर येथेंच स्थायिक झाले होते. तेव्हां पुष्कळ वर्षेंपर्यंत पुण्याच्या प्रार्थनासमाजाला या दोन थोर पंथप्रमुखांचें मार्गदर्शन लाभलें. याखेरीज समाजाचा आणखी फायदा म्हणजे श्री. वा. आ. मोडक व श्री. चिंतामणराव भट यांसारखे पंथाचे इतर पुढारीहि त्याच्या कार्यांत भाग घेत व वाढ होण्यास मदत करीत. १८७८ सालीं म्हणजे स्थापनेपासून आठ वर्षांतच समाजाच्या सभासदांनीं एक जागा मिळवून तीवर एक लहान मंदिर बांधलें. पुढें १९०७ सालीं या पहिल्या मंदिरा पुढील मोकळ्या जागेंत नवीन मोठें मंदिर बांधून त्याला 'श्रीहरिमंदिर' असें नांव दिलें. १९२१ मध्यें समाजानें सुवर्णमहोत्सव साजरा केला व पहिल्या मंदिराच्या जागेवर एक दुमजली आश्रम बांधला. या आश्रमाला समाजानें डॉ. भांडारकर यांच्यासंबंधीं कृतज्ञताबुद्धि ठेवून 'भांडारकर आश्रम' असें नांव ठेवलें. कारण डॉ. भांडारकर यांनीं आस्तिकमताच्या वाढीसाठीं बहुमोल सेवा केली होती व विशेषतः पुणें प्रार्थनासमाजासाठीं त्यांनीं फार परिश्रम घेतले होते. ते त्याचे कित्येक वर्षें अध्यक्ष होते. या आश्रमांत एक चांगलें लहान ग्रंथालय असून धर्मप्रचारकांना राहण्याचीहि सोय आहे.

साप्ताहिक उपासना आणि वार्षिक उत्सव यांखेरीज आरंभीं कित्येक वर्षें समाज संगतसभा भरवी. ही संगतसभा नियमानें भरत असे व धार्मिक, नैतिक आणि आध्यात्मिक विषयांवर सभासदांमध्यें चर्चा होत. अशा सभेची मूळ कल्पना पुण्यास निघून पुढें ती मुंबई समाजानें स्वीकारली.

**दि तुकाराम सोसायटी—**

ही संस्था तुकारामाच्या अभंगांचा अभ्यास करण्यासाठीं डॉ. भांडारकरांच्या अध्यक्षतेखालीं निघाली. या विषयाची कळकळ बाळगणाऱ्यांचा एक वर्ग तयार होऊन ठराविक वेळीं तो चर्चेसाठीं जमत असे. प्रो. वा. ब. पटवर्धन हे संस्थेचे चिटणीस असून ते या चर्चांतील मुद्यांचीं टांचणें ठेवीत. या प्रो. पटवर्धनांच्या टांचणांवरून प्रो. ग. ह. केळकर यांनीं एक पुस्तक प्रसिद्ध केलें आहे. पुणें प्रार्थनासमाजानें लग्नविधीसारख्या सहा धार्मिक विधींचें एक लहान पुस्तक छापलें आहे. समाजाच्या सभासदांसाठीं व इतरांसाठींहि डॉ. रा. गो. भांडारकर यांनीं हे विधी तयार केले. यांतील लग्नविधीचा उपयोग समाजाचे सभासद व बाहेरचे लोक बराच करतात.

पुणें प्रार्थनासमाजानें या नवीन पंथाच्या धर्मप्रचाराच्या कार्यांतहि बराच भाग घेतलेला आहे. श्री. मोती बुलासा, श्री. वि. रा. शिंदे व श्री. वा. अ. सुखटणकर हे पहिले तिघे युनिटेरियन शिष्यवृत्ति स्वीकारून ऑक्सफोर्डला जाणारे विद्यार्थी पुणें प्रार्थनासमाजाचेच सभासद होते. या धर्मप्रचारासाठीं समाजनेत्यांकडूनहि मोठें प्रोत्साहन मिळे. समाजानें १८९८ सालीं श्री. शिवराम नारायण गोखले यांना सबंध वेळचे आपले धर्मप्रचारक म्हणून नेमले होते व श्री. गोखले यांनीं मरेपर्यंत (१९३१) हें काम केलें. साधारण सभासदच पण हें काम करणारे अशा मंडळींत श्री. वा. अ. उर्फ मामा गरुड यांचा उल्लेख करावा लागेल. ते पोष्टखात्यांतून सेवानिवृत्त झाले असून आपला सर्व वेळ आणि सामर्थ्य मागें पुढें न पाहतां समाजाच्या सेवेसाठीं देत असतात. अलीकडे अकोल्याचे श्री. त्र्यं. रा. गद्रे हे दरसाल कांहीं महिने पुण्यांत राहून समाजाचें धर्मप्रचाराचें काम करीत असतात.

**अहमदाबाद प्रार्थनासमाज—**

अहमदाबादेस १८७१ सालीं रावबहादूर भोलानाथ साराभाई, रावसाहेब महिपतराम रूपराम व श्री. लालशंकर उमियाशंकर यांच्या नेतृत्वाखालीं थोड्याशा पण निष्ठावंत मंडळींनीं एकत्र येऊन प्रार्थनासमाजाची स्थापना केली. १८७६ मध्यें एक जागा विकत घेऊन त्यांनीं तीवर समाजासाठीं

एक मंदिर उभारलें. धर्मप्रचारकांसाठीं या मंदिराच्या आवारांतच राहाण्याची सोय केली आहे. या वेळीं श्री. सत्येंद्रनाथ टागोर यांची अहमदाबादेस डिस्ट्रिक्ट जज्ज म्हणून बदली झाली. त्यांचें तेथील वास्तव्य व त्यांनीं समाजाच्या कार्यांत घेतलेला प्रत्यक्ष भाग यांमुळें समाजाची मोठी प्रगति झाली. त्यानंतर रमणभाई निळकंठ व त्यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी लेडी विद्यागौरी यांचा मोठा आधार या समाजाला असे.

**अहमदनगर प्रार्थनासमाज—**

अहमदनगर येथें श्री. शंकर पांडुरंग पंडित व श्री. मोरो चिंतामण जोशी यांच्याकडून स्फूर्ति मिळून श्री. सहदेवराव बागडे यांसारख्या स्थानिक पुढाऱ्यांनीं एकत्र येऊन १८७४ सालीं प्रार्थनासमाजाची स्थापना केली. पुढें १८८८ मध्यें रावबहादूर लालशंकर उमियाशंकर यांच्या प्रोत्साहनामुळें शहराच्या मध्यभागीं एक लहानसें मंदिर उभारलें गेलें.

**वांई ब्राह्मसमाज—**

अलीकडे सातारा जिल्ह्यांतील वांई येथें श्री. वि. रा. शिंदे यांची मदत घेऊन स्थानिक पुढाऱ्यांनीं एक समाज स्थापन केला व त्याला स्वतःची एक इमारत करून दिली. या 'वांई ब्राह्मसमाजा'ला पुण्यामुंबईकडच्या मित्रांकडून बरेंच प्रोत्साहन मिळत गेलें आहे.

**इंदूर ब्राह्मसमाज—**

मध्यहिंदुस्थानांत इंदूर येथें मुंबईकडच्या कांहीं मंडळींनीं स्थानिक पुढाऱ्यांच्या मदतीनें १८८३ सालीं समाज स्थापन केला. पुढें लवकरच एक जागा मिळवून तीवर समाजासाठीं इमारत उभारली. १८९२ सालीं प्रार्थनासमाज हें नांव बदलून 'मध्य भारतीय ब्राह्मसमाज' असें नांव दिलें.

**द. हैद्राबाद ब्राह्मसमाज--**

प्रो. ना. गु. वेलिंगकर हे हैद्राबादेस जाऊन स्थायिक झाल्यानंतर कांहीं उदारधर्म मतवादी स्नेह्यांच्या मदतीनें एक समाज स्थापन केला. हा समाज हैद्राबाद ब्राह्मसमाज या नांवानें ओळखला जातो.

# प्रार्थनासमाजाची शिकवण

## परमेश्वर म्हणजे विश्वतत्त्व—

प्रार्थनासमाजाच्या मतें परमेश्वर हा विश्वाचें अंतिम तत्त्व आहे; तो मनुष्य आणि सृष्टि यांना व्यापून आहे तरी सर्व वस्तूंपासून निराळा आहे; तो सर्वांची वाढ करवून त्यांना उच्च स्वरूप प्राप्त करून देतो. मनुष्याला त्याच्या आयुष्यांतील दैनंदिन व्यवहारांतच परमेश्वर प्रतीत होत असतो– तो मावळत्या सूर्याच्या प्रकाशांत, भोंवतालच्या महासागरांत, वाहात्या वाऱ्यांत, नील आकाशांत व मानवी अंतःकरणांत वास करतो; सर्व विचारी वस्तूंना, सर्व विचारांच्या सर्व विषयांना चेतना देणारें गतितत्त्व असा तो असून सर्व वस्तुमात्रांत वावरत आहे. अशा प्रकारांनीं साक्षात्कार देणाऱ्या परमेश्वराबद्दल माणसाला साहजिकच प्रेम आणि आदर वाटत असतो. मनुष्याला प्रेमाच्या योगानें परमेश्वराचा सहवास लाभतो; व या सहवासामुळें त्याला आपल्यांतील पाशवी वृत्तीवर मात करण्यासाठीं व नैतिक स्वत्व मिळविण्यासाठीं आध्यात्मिक बळ प्राप्त करून घेतां येतें. खरी उपासना आणि प्रार्थना यांतील रहस्य हेंच आहे.

## उपासनेची आध्यात्मिक रीत—

यासाठींच प्रार्थनासमाज आपणांस मूर्तिपूजा आणि तीबरोबर येणारे सर्व निरर्थक विधी टाकून देऊन अशी उपासनेची आध्यात्मिक रीत पत्करावयास सांगतो. जे संन्यासाचा मार्ग पत्करतात त्यांना मनुष्याची आध्यात्मिक आणि नैतिक उन्नति करणारी अशा तऱ्हेची उपासना व परमेश्वराचा सहवास लाभणें शक्य होत नाहीं. हें शक्य होतें कोणाला– कीं जे चांगले गृहस्थाश्रमांत राहून संसारांतील कठीण प्रसंग आणि दिव्यें यांना तोंड देऊन परमेश्वरप्राप्ति करूं बघतात व परमेश्वराचें राज्य सर्वत्र नांदण्याची इच्छा धरतात.

## संसार म्हणजे स्वातंत्र्य—

जर सर्वत्र माणसांनीं या सन्मार्गाचा अवलंब केला तर त्यांना एक दिवस

असें आढळून येईल कीं, संसार हा परमेश्वरानें माणसाच्या स्वातंत्र्यासाठीं, मुक्तीसाठीं घडविला आहे; त्याला जखडून टाकणारी ती बेडी म्हणून ती परमेश्वरानें तयार केलेली नव्हे. म्हणून समाज आपणाला सांगतो कीं, हा संसार सोडूं नका, तर चांगले गृहस्थाश्रमी आयुष्य घालवा व आपल्या बांधवांची निःस्वार्थपणें सेवा करा; म्हणजे आपल्या निर्मात्याची– परमेश्वराची– सेवा आपोआप घडेल. समाज सर्व माणसांशीं बंधुभाव ठेवण्याचा उपदेश करतो व माणसापासून माणसाला दूर ठेवणारे जाती, वर्ग, पंथ इ. चे अडथळे बाजूला करण्यास सांगतो.

**मानवी भवितव्यता—**

प्रार्थनासमाजाचा ईश्वरी अवतारांवर विश्वास नाहीं. त्याच्या मतानें सर्व माणसें परमेश्वराचीं लेंकरें आहेत, कारण त्यांच्यांत प्रामुख्यानें दैवी तत्त्व वास करीत आहे. कांहीं जणांत दैवी तेज विशेष दीप्तिमान् असतें व त्यांना कवी व पैगंबर म्हणून मानण्यांत येतें व बाकीचे लोक त्यांना आपले नेते आणि मार्गदर्शक समजतात. पण सर्वांचें व्यक्तित्व मर्यादित आहे व कोणीहि मर्यादा ओलांडून जाऊं शकत नाहीं. समर्याद व्यक्ती म्हणूनच ते जगतात, वावरतात व परमात्म्यांत विलीन होण्याचा सारखा प्रयत्न करतात व त्या अमर्याद अनंत सत्तत्त्वाच्या जवळ जवळ जातहि असतात; पण त्यांना मात्र ही आपली प्रगति कळत नाहीं. व्यक्तीच्या या प्रगतीला कोठेंहि मर्यादा नसते. मृत्यूमुळेंहि अडथळा येत नाहीं. समाजाचा, मरणोत्तरहि व्यक्तीचें सतत अस्तित्व असतें यावर विश्वास आहे; पण या अवस्थेंतील परिस्थितीचें नक्की स्वरूप सांगण्याचा अट्टहास मात्र तो धरीत नाहीं. या प्रगतीचें उद्दिष्ट परमेश्वराचा अखंड सहवास आहे. यालाच न्या. मू. रानडे ईश्वरी कृपा किंवा सिद्धि समजतात.

**सर्व धर्मांविषयीं आदरभाव—**

सर्व धर्मांची हीच शिकवण आहे. त्या सर्वांतून हेंच सुवर्णसूत्र ओंवलेलें आहे व विशिष्ट उगम आणि विशिष्ट वाढीचा प्रकार यांमुळेंच त्याला निरनिराळ्या धर्मांत निरनिराळें रूप प्राप्त झालेलें दिसतें. प्रार्थनासमाजाला सर्वच धर्मांविषयीं आदर वाटतो व कोणाचाहि तो तिरस्कार करीत

नाहीं. सर्व धर्म म्हणजे परमेश्वरानें प्रकट केलेलें ज्ञान (श्रुति) असून ज्यांच्या-जवळ तें प्रकट केलें त्यांच्या मर्यादित व्यक्तित्वामुळें हें प्रकटीकरण अपूर्ण व अयथार्थपणें व्यक्त झालेलें आहे. तेव्हां समाज या धर्मांतील सोनें तेवढें काढून घेतो व सोन्यांत झालेली भेसळ टाकून देतो. यामुळें समाज कोणीहि व्यक्ति किंवा ग्रंथ दोषातीत समजत नाहीं व सर्व मानवी कृत्यां-तून आणि विचारांतून सत्यासत्याची निवड करण्यासाठीं परमेश्वरानें आपल्याला दिलेली दृष्टि वापरण्याचा अधिकार आणि स्वातंत्र्य आपणांस आहे, असा समाज दावा सांगतो.

## शास्त्र हें प्रकटीकरणच आहे—

अर्वाचीन शास्त्रीय शोधांवरूनहि या विश्वाची मूलभूत सुव्यवस्था सिद्ध झालेली आहे व विश्व हें अणु-परमाणु यदृच्छया एकत्र येऊन तयार झालें असें मुळींच नसून विशिष्ट ज्ञानमय हेतूचा तो आविष्कार आहे व हा हेतु जागतिक क्रियेंतूनच आपोआप तडीस जात आहे; व आपआपल्या उद्दिष्टामागें लागलेली जनता आणि जमाती वरील ज्ञानमय हेतूच्या सिद्धयर्थच कार्यमग्न असतात. ही गोष्ट आधुनिक शास्त्रानें पुष्कळच सिद्ध झालेली आहे. जगांत झगडे चालू आहेत हें खरें; पण ज्यांनीं शास्त्राचा चांगला अभ्यास केला आहे त्यांचा पाहाण्याचा दृष्टिकोण असा बनतो कीं, या प्रकारचे झगडे कोणत्याहि गोष्टींच्या अंतिम स्वरूपाचे दर्शक होऊं शकणार नाहींत. याप्रमाणें विश्वज्ञान हें मानव आणि पदार्थ यांना जीवनाच्या उच्च उच्च प्रकारांकडे नेत आहे. व धर्म काय किंवा शास्त्र काय, कोणाच्याहि दृष्टीनें पाहिल्यास जग म्हणजे समता आणि एकतानता होय, असें दिसून येईल. तेव्हां प्रार्थनासमाज अर्वाचीन शास्त्राचें स्वागतच करतो व त्याच्याविषयीं पूर्ण स्नेहाची भावना बाळगतो. शास्त्र आणि धर्म यांमध्यें समाजाला कांहीं विरोध दिसत नाहीं.

## डोळस श्रद्धा—

समाजाची धर्मश्रद्धा अंधश्रद्धा म्हणतां येणार नाहीं. नुसत्या गूढ-वाद्यांचा हा धर्म नव्हे. इतर धर्मांतल्याप्रमाणें यांतहि गूढवाद आहे; पण जीवित आणि जगत् यांसंबंधींच्या त्याच्या मताची बौद्धिक छाननी

करण्याच्या आड तो येत नाहीं. अशा कसोटीला आपली धर्मश्रद्धा चांगलीच टिकेल, अशी समाज ग्वाही देतो.

## प्रार्थनासमाजाचें विशिष्टत्व

बंगाल्यांत ब्राह्मो मंडळींनीं आपल्या धार्मिक चळवळीच्या प्रारंभींच्या काळांत आपला एक निराळाच गट बनवून हिंदुसमाजापासून ते अलग राहिले. हिंदूंहून आपण निराळे हें दाखविण्यासाठीं त्यांनीं स्वतःला ब्राह्मो हें नांव घेतलें. तेव्हां साहजिकच वाटेंत एक धोंड उत्पन्न झाली व ती या नवीन धर्मपंथाला दूर करतां येईना. यामुळें बंगाल्यांतील हिंदूंनीं या नवीन पंथाचा फारसा स्वीकार केला नाहीं. अलीकडे ब्राह्मोंना आपली प्रारंभींची चूक कळून आली आहे असें दिसतें. कारण हल्लीं ब्राह्मो आणि हिंदू यांतील भेद कोणी प्रामुख्यानें पुढें ठेवीत नाहीं किंवा तंतोतंत पाळीतहि नाहीं.

**प्राचीन परंपरा—**

पश्चिम हिंदुस्थानांतील प्रार्थनासमाजानें आरंभींच असा भेद न ठेवण्याची दक्षता घेतली. समाजाच्या मतें ब्राह्मधर्म हा त्या पंथाच्या पुढाऱ्यांनीं जणूं प्रथमच लोकांपुढें मांडला असा नवा धर्मसंप्रदाय नाहीं. न्या मू. रानडे व डॉ. भांडारकर यांसारख्या प्रार्थनासमाजाच्या प्रमुखांनीं उपनिषदांच्या प्राचीन भारतीय ऋषींपावेतों मागें ब्राह्मधर्माचा छडा लावलेला आहे; उपनिषदांनंतर भगवद्गीता, पुराणें, मध्ययुगांतील संतकवींचीं काव्यें अशी आजतागायत अखंड व फार मोठी परंपरा त्यांनीं सिद्ध करून दाखविली आहे. त्यांच्या मतें इतर धर्मानुयायांनाहि त्यांनीं शोध केल्यास त्यांच्या धर्मासंबंधीं अशीच प्राचीन धर्मविचारपरंपरा सांपडेल. यामुळें सर्व धर्मांतील ईश्वरी सत्याचें ऐक्य सिद्ध होईल व त्यांच्या अनुयायांच्या सामाजिक चालीरीती आणि संस्कृति यांच्या भिन्नत्वामुळें उत्पन्न झालेले धर्मांचे निरनिराळे प्रकार असले तरी त्यांमध्यें स्नेहभाव प्रस्थापित होईल. ब्राह्मधर्माला खरें प्रकटीकरण आणि मानवप्रगतीचा धर्म म्हणून हें सत्य मान्य आहे; व त्या दृष्टीनें ब्राह्मधर्म हा सर्वांचा

धर्म आहे किंवा होऊं शकेल. खुद्द हिंदुस्थानांत मागें उपनिषदांपर्यंत त्याची स्वतःची अखंड परंपरा आहे. प्रार्थनासमाजाला याची पूर्ण जाणीव असल्यानें तो मोठ्या हिंदुसमाजापासून अलग राहिला नाहीं.

## जनतेची उपेक्षा

तेव्हां पश्चिम हिंदुस्थानांत प्रार्थनासमाजाच्या धर्मपंथाचा जनतेकडून स्वीकार होण्याची फार चांगली संधि होती; पण दुर्दैवानें तसें घडलें नाहीं. या नवीन पंथाचा फारसा कोणीं स्वीकार केला नाहीं. समाजाच्या सभासदांचें वर्तन समाजाच्या तत्त्वांप्रमाणें नव्हतें म्हणून असें झालें, असें कांहीं म्हणतात. सभासदांनीं नेहमींच मूर्तिपूजा आणि जातिबंधनें हीं टाकलेलीं नव्हतीं. परमेश्वर आणि जग यांमध्यें जेव्हां विरोध येई तेव्हां नेहमींच त्यांनीं परमेश्वराच्या बाजूस जाण्याचें धैर्य दाखवून परिणामाला ते तयार राहिले नाहींत. पण जनतेकडून समाजाला मोठें साहाय्य मिळविण्यांत आलेल्या अपयशाची ही मीमांसा अगदीं बरोबर आहे असें नाहीं. तत्त्वच्युतीचे हे दाखविलेले दोष सर्वच धर्मांच्या अनुयाय्यांत सांपडतील. तरी सुद्धां त्यामुळें असाच एक परिणाम झाला असें इतरत्र दिसणार नाहीं. आमच्या तत्त्वच्युतींवर पांघरूण घालण्यासाठीं असें आम्हीं म्हणत नसून वस्तुस्थितीचें या एका खुलाशानेंच पूर्ण विवरण होणार नाहीं एवढेंच दाखविलें. निर्विकार बुद्धीनें जे सर्व वस्तुस्थितीची माहिती करून घेतील त्यांना असें आढळून येईल कीं, हा मोठा व चांगला पंथ आजवरच्या इतर अनेक चांगल्या पंथांप्रमाणेंच निष्ठावंत कार्यकर्त्यांच्या अभावीं शिथिल पडला आहे व या अभावाचें कांहीं अंशीं कारण जवळ पुरेशीं साधनें नाहींत हें होय.

## भावी आशा

आतांपर्यंत लोकांनीं समाजाचा संदेश बहुतेक दुर्लक्षिला आहे, ही दुःखाची गोष्ट आहे खरी. तो असा दुर्लक्षिला जाण्यास खचित पात्र नाहीं. विशेषतः जेव्हां देशाला राजकीय स्वातंत्र्य लाभलें आहे अशा या नवीन काळांत प्रार्थनासमाजाच्या धर्माला मोठा पाठिंबा मिळणें योग्य

आहे. हिंदुस्थानांत लोकशाही स्थापन करण्याची व जगांतील अशाच लोकशाहीचा एक जागतिक संघ स्थापन करण्याला हातभार लावण्याची आमची इच्छा आहे. आपल्या शेजाऱ्याशीं भांडून त्याला दूर करणें ही माणसाची अंतिम वृत्ति नव्हे तर आपल्याप्रमाणेंच आपल्या शेजाऱ्यावर प्रेम करण्याची त्याची वृत्ति असावी अशी सर्व ठिकाणच्या लोकांना शिकवण देणें व इतर राष्ट्रांना वरील ध्येयाकडे नेणें हिंदुस्थानचें काम आहे. सर्व लोकशाहीला आधारभूत असणारें थोर ध्येय प्राप्त करून घेण्याची हिंदुस्थाननें आशा ठेवावयाची असल्यास, हिंदी लोकांनीं प्रथम सर्व माणसांच्या ठिकाणीं बंधुभाव आणि परमेश्वराच्या ठिकाणीं पितृभाव या उद्दिष्टाची जाणीव करून घेतली पाहिजे. व यासाठीं त्यांनीं भक्तिपंथाची निष्ठेनें कास धरली पाहिजे व इतरांना तसें करावयास लाविलें पाहिजे. याखेरीज गत्यंतर नाहीं. याच भक्तिपंथाची आजच्या काळाला आणि जगाला साजेशी थोर आवृत्ति म्हणजेच ब्राह्मधर्म होय.

गेल्या शतकाच्या अखेरीस आणि चालू शतकाच्या आरंभीं धर्माला कमी लेखणें ही प्रथा(फॅशन)च पडून गेली होती. स्वतःला अनीश्वरवादी म्हणवून घेण्यांत लोकांना भूषण वाटे. पण गेल्या दोन महायुद्धांच्या अनुभवामुळें हा दृष्टिकोण बदलला आहे. आज जगांत सर्वत्र निरनिराळ्या समाजांच्या विचारी लोकांमध्यें अशी जाणीव उत्पन्न झाली आहे कीं, या अणुशक्तीच्या युगांत माणूस जर हिंदुस्थानांतील प्राचीन ऋषी आणि इतर देशांतील धार्मिक प्रवक्ते यांच्या संदेशाकडे वळेल तरच त्याची धडगत आहे. हे ऋषी आणि प्रवक्ते यांच्या उपदेशांतील आगंतुक गोष्टींमधून मूलभूत किंवा सारभूत गोष्टी बाजूला काढून घेतल्या तर आपणांला त्यांचा संदेश हा ब्राह्मधर्माच्या संदेशाहून निराळा नाहीं, असें दिसून येईल. सर्व ठिकाणच्या विचारवंतांना असें पटूं लागलें आहे कीं, हा जुना मार्ग ( दुर्दैवानें हा अद्याप नवाच राहिलेला आहे; कारण त्यावरून फारसें कोणी गेलेलें नाहीं ! ) एकच काय तो मनुष्याच्या मुक्तीचा मार्ग आहे. आतां त्यांना ही गोष्ट पटली हें मानवजातीच्या भवितव्याचें खरोखरीच सुचिन्ह होय.

---

पोतदार ग्रंथसंग्रह
दि. ब. द. वा. पोतदार

# सुबोधन आणि धर्मचिंतन

[ श्री. वामन अनंत गरुड यांचीं प्रवचनें ]

संपादक—चिंतामण गणेश कर्वे

( ज्ञानकोश-शब्दकोश इ. कोशांचे कर्ते )

—×—

" गोमुखांतून येत असल्याकारणानें गंगोदकाचें प्राशन मनुष्य श्रद्धेनें करतो, त्याचप्रमाणें 'सुबोधन आणि धर्मचिंतन' यांतील सात्विक व शुद्ध धर्मतत्त्वांचें ग्रहण वाचक करील यांत संशय नाहीं; कारण तीं तत्त्वें गरुड-मुखांतून– पवित्र स्थानांतून– प्रकट झालीं आहेत. चित्तशुद्धीला असल्या ग्रंथाची अवश्यकता असते."

— ना. गो. चापेकर ( बदलापूर )

**किं. १॥ रुपाया**

पुस्तक मिळण्याचें ठिकाण —

**चिं. ग. कर्वे**, २०४ सदाशिव, पुणें २

# प्रार्थनासमाजास मान्य असलेलीं धर्मतत्त्वें

१. परमेश्वरानें हें जग उत्पन्न केलें. तोच एक खरा देव, त्याशिवाय दुसरा देव नाहीं. तो नित्य, ज्ञानस्वरूप, अनंत, कल्याणनिधान, आनंददायक, निरवयव, निराकार, एकच, अद्वितीय, सर्वांचा नियंता, सर्वव्यापी, सर्वज्ञ, सर्वशक्ति, कृपानिधि, प्रेमस्वरूप, परमपवित्र, पतितपावन असा आहे.

२. केवळ त्याच्याच उपासनेच्या योगें येथें व परलोकीं शुभ प्राप्त होतें

३. त्याच्यावर प्रीति, पूज्यबुद्धि व अनन्यभाव हीं ठेवून त्याप्रमाणें त्याचें मनन, भजन, पूजन करणें व त्यास प्रिय अशीं कृत्यें करणें हीच त्याची खरी उपासना होय.

४. मूर्ति व इतर जड पदार्थ यांची पूजा किंवा प्रार्थना करणें हा ईश्वरोपासनेचा खरा प्रकार नव्हे.

५. परमेश्वर सावयवरूपानें अवतार घेत नाहीं. कोणताही एक ग्रंथ साक्षात् ईश्वरप्रणीत किंवा सर्वांशीं प्रमाण नाहीं.

६. सर्व मनुष्यें एका परमेश्वराचीं लेंकरें आहेत. म्हणून भेद न राखतां परस्परांशीं बंधुभावानें वागावें, हें ईश्वरास प्रिय आहे आणि हें मनुष्याचें कर्तव्य आहे.